

रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १०३
www.ramprahar.com
मंगळवार, २९ ऑक्टोबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग
टाकीगावच्या कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश/३
आमदार महेंद्र दळवी यांनी केला अर्ज दाखल/५
शिवसेना उबाठाची अस्तित्वासाठी धडपड/७

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केला उमेदवारी अर्ज

# पनवेलमध्ये महायुतीचे शक्तिप्रदर्शन

### विजयाचा चौकार मारण्यासाठी सज्ज

### सर्व समाज बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**विजयाची हॅट्ट्रिक करून आता विजयाचा चौकार मारण्यासाठी सज्ज असलेले भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी (दि. २८) उमेदवारी अर्ज प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक यांच्याकडे दाखल केला.**

या वेळी महायुतीतील नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सर्व समाज बांधवांचा जल्लोषात सहभाग होता. विशेष म्हणजे शक्तिप्रदर्शन हा विषयच नव्हता, मात्र हजार कार्यकर्त्यांनी प्रेमापोटी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेऊन आपला जल्लोष ढोलताशाच्या गजरात दाखवून दिला आणि त्याचे रूप शक्तिप्रदर्शनात झाले होते.

पनवेलच्या विकासाला गती आणि दिशा देण्याचे काम कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे. सामान्य कार्यकर्ता ते आमदार तरीही कोणता बडेजाव नाही. साधी राहणी, लोकांच्यात सातत्याने वावरणारे आणि पनवेलच्या विकासाचा महामेरू असे व्यक्तिमत्व म्हणून आमदार प्रशांत ठाकूर परिचित आहेत. त्यांचा अर्ज दाखल करताना युवा, महिला, ज्येष्ठ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी जागोजागी उत्स्फूर्त स्वागत होत असताना विजयी भव असा आशीर्वाद आमदार प्रशांत ठाकूर यांना मिळत होता.

या वेळी 'महायुतीचा विजय असो, 'एकच वादा प्रशांतदादा', 'प्रशांतदादा आगे बढो हम तुम्हारे साथ है', अशा गगनभेदी घोषणांनी पनवेल दुमदुमला होता. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि लोकप्रतिनिधी, हजारो कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांच्या उपस्थितीत पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालय येथून निघालेली रॅली शहरातून प्रांत अधिकारी कार्यालय येथे पोहचली. तत्पूर्वी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर **(पान २ वर..)**

> आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विधायक कार्यप्रणालीमुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. आता विरोधक काय करू आणि काय ठेवू करत बसले आहेत. आपल्या लढाईला विरोधक नाही. आपली लढाई फक्त मताधिक्य रेकॉर्ड ब्रेक करण्यासाठी आहे. पनवेलमध्ये लाडक्या बहिणींना ताकद देण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे. त्यामुळे माता भगिनी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभ्या आहेत. निवडणुकीत विरोधकांना बोलण्यासारखे काही नाही म्हणून ते खोटा प्रचार करतील. आपण सर्वांनी याबाबतीत सावध राहिले पाहिजे.
>
> **–विक्रांत पाटील, आमदार, विधान परिषद**



**(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)**

## पेणमध्ये आमदार रविशेठ पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल



(छाया : इजाज मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

महायुतीच्या हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पेण पाली सुधागड मतदारसंघाचे उमेदवार रविशेठ पाटील यांनी सोमवारी (दि.२८) आपला उमेदवारी अर्ज दाखल करीत भव्य शक्तिप्रदर्शन केले. या वेळी त्यांच्यासोबत खासदार धैर्यशील पाटील, आमदार अनिकेत तटकरे, जि.प. माजी अध्यक्ष निलिमा पाटील, माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील, गटनेते अनिरुद्ध पाटील आदींसह महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी अंतोरा रोड येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख मान्यवरांसह भाजप युवा मोर्चा प्रदेश अध्यक्ष अनुप मोरे, युवा मोर्चा सचिव सारंग मेढेकर, चिटणीस निखिल चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष दयानंद भगत, भाजप तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, माजी जि.प. सदस्य कौसल्याताई पाटील, गटनेते अनिरुद्ध पाटील, युवा नेते ललित पाटील, प्रशांत पाटील, स्नुषा सुषमा पाटील, प्रतिभा पाटील, मा.जि.प. सदस्य प्रभाकर म्हात्रे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

रविशेठ पाटील यांनी उमेदवार अर्ज दाखल करताना जनतेचा जो अलोट महासागर लोटला असून यातून आपला विजय निश्चित असल्याने सांगितले. पेण तालुक्यात विरोधकांकडे खंबीर उमेदवार नसून आपला विजय निश्चित आहे. तालुक्यात भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, आर पीआय पक्ष व इतर मित्र पक्षाची महायुती असून यापुढे कोणीही टिकणार नाही, असे सांगितले. **(पान २ वर..)**

## आमदार महेश बालदी आज दाखल करणार अर्ज



**उरण : वार्ताहर**

उरण विधानसभा मतदारसंघातून भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय व मित्रपक्ष युतीचे उमेदवार आमदार महेश बालदी मंगळवारी (दि.२९) उमेदवारी अर्ज निवडणूक अधिकारी यांच्याकडे दाखल करत विजयाचा शंखनाद करणार आहेत.

विकासाला प्राधान्य देणारे आमदार महेश बालदी मताधिक्य मिळवून विजयी होण्यासाठी ज्येष्ठ, युवा, महिला, कार्यकर्ते व मतदारराजाच्या आशीर्वादाने सज्ज झाले आहेत. मंगळवारी सकाळी ९ वाजता उरण जासई येथील शिव समर्थ स्मारक दास्तान फाटा येथील सभागृहात महायुतीतील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत अर्ज दाखल करणार आहेत.

आपल्या कार्यकौशल्यातून उरणमध्ये विकासाची गंगा आणणारे तसेच कर्तव्यदक्ष व नेतृत्त्व गुणसंपन्न नेते आमदार महेश बालदी हे नागरिकांमध्ये लोकप्रिय आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा त्यांना जनतेचा कौल मिळणार असून मंगळवारी ते उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

## उरण डाऊरनगरमधील ठाकरे गटाचे कार्यकर्ते भाजपमध्ये



**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण मतदारसंघात विधानसभा निवडणुकीत उबाठा गटाला धक्का बसला असून उरण डाऊरनगरमधील अनेक तरुणांनी आमदार महेश बालदी यांच्या सक्षम नेतृत्वावर प्रभावित होऊन भाजपमध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला.

या वेळी कार्यकत्यांची साथ आणि समर्थांच्या आशीर्वादाने आमदार झालो आणि दिलेला शब्द पूर्ण केला त्यामुळे यंदाही जो शब्द देईन, तो पूर्ण करेन, अशी ग्वाही आमदार महेश बालदी यांनी दिली.

या कार्यक्रमात जितेश ठाकूर, विक्रांत ठाकूर, उमेश कदम, सतीश वाघरी, अमीर म्हात्रे, विनीत म्हात्रे, अमित म्हात्रे, सोहम पाटील, अंकुश गारंडे, लव गारंडे, विनीत साळवी, यांच्यासह अनेक युवकांनी तसेच महिलांनी भाजपचे विकासाचे कमळ हाती घेतले.

या कार्यक्रमाला भाजपचे उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विजय भोईर, चाणजेचे माजी सरपंच जितेंद्र घरत, विजय ठाकूर, राजू ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



## 'रामप्रहर'चा दिवाळी अंक सर्वांसाठी वाचनीय -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विविध लेख, कथा यांची सांगड घालून तयार केलेला 'रामप्रहर'चा दिवाळी अंक सर्वांसाठी वाचनीय असल्याचे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सोमवारी (दि.२८) केले. या दिवाळी अंकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर उपस्थितीत होते.

रायगड, नवी मुंबईत वाचकांच्या पसंतीस उतरलेल्या 'रामप्रहर'च्या टीमने कॅलिडोस्कोप या शीर्षकाखाली दिवाळी अंक प्रसिद्ध केला आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी 'रामप्रहर'चे कर्मचारी आणि वाचकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

प्रकाशन समारंभास 'रामप्रहर'चे मुख्य संपादक देवदास मटाले, व्यवस्थापक दादाराम मिसाळ, उपसंपादक तन्वी गायकवाड-पवार, सायली रावले-वैद्य, मुख्य आर्टिस्ट अरुण चवरकर, आर्टिस्ट शशिकांत बारसिंग, लेखापाल उद्धव घरत, पत्रकार नितीन देशमुख आदी उपस्थित होते.

## विधानसभा निवडणुकीतही महायुतीचा धर्म पाळला जाईल -उपमुख्यमंत्री फडणवीस

**ठाणे : प्रतिनिधी**

महायुती विधानसभा निवडणुकीसाठी पूर्णपणे सज्ज असून या मतदारसंघातूनच नव्हे तर सर्वच मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार निवडून येतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. ठाणे शहर विधानसभेचे भाजपचे उमेदवार संजय केळकर यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी त्यांनी सोमवारी हजेरी लावली होती. या वेळी बोलताना त्यांनी हा विश्वास व्यक्त केला.

महायुतीचा धर्म या निवडणुकीमध्येदेखील पाळाला जाईल असेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले. केळकर यांचा उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी नौपाडा, राम मारुती रोड या भागातून रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत काही अंतरापर्यंत फडणवीस सहभागी झाले होते. सोमवारी सकाळी १०.३०च्या सुमारास केळकर यांनी घंटाळी देवीचे दर्शन घेतले. घंटाळीवरुन गोखले रोड मार्गे, जांभळीनाक्यावरून पुढे टेंभी नाक्यावर दाखल झाले. येथे संजय केळकर यांनी आनंद आश्रमात जाऊन दिवंगत शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर ही रॅली साडे बाराच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाली. या वेळी ज्या ज्या भागातून ही रॅली गेली, त्या त्या भागात वाहतूक कोंडी झाल्याचे दिसून आले.



दरम्यान, उमेदवारी अर्ज भरण्यासाठी महायुतीतील सर्व मंडळी उपस्थित होते. त्यामुळे महायुतीचाच विजय निश्चित आहे. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह असून मतदार राजा आशीर्वाद देईल हे निश्चित आहे, असे ठाणे शहर विधानसभेचे भाजपचे उमेदवार संजय केळकर यांनी म्हटले आहे.

## रायगड जिल्ह्यात ३४ नामनिर्देशनपत्र दाखल

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरण्यास २२ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे. सोमवारी (दि.२८) नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या पाचव्या दिवशी जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघात ३१ उमेदवारांचे ३४ नामनिर्देशनपत्र दाखल झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे.

पनवेल मतदारसंघामध्ये सात उमेदवारांनी नऊ नामनिर्देशनपत्र सादर केले आहेत. यात प्रशांत रामशेठ ठाकूर (भारतीय जनता पक्ष) दोन अर्ज, कांतीलाल हरिश्चंद्र कडू (अपक्ष), कांतीलाल हरिश्चंद्र कडू (लोकमुद्रा जनहित पार्टी), लीना अर्जुन गरड (शिवसेना, उबाठा), अरुणशेठ जगन्नाथ भगत (भारतीय जनता पक्ष), पवन उत्तमराव काळे (भारतीय जन सम्राट पार्टी), गजेंद्र कृष्णदास अहिरे (बहुजन समाज पार्टी), डॉ. वसंत उत्तम राठोड (डिजिटल ऑर्गनायझेशन ऑफ नेशन) **(पान २ वर..)**

# कोल्हापुरात 'मविआ'त उमेदवारीवरून गोंधळ

## कार्यकर्त्यांकडून दगडफेक, बंडखोरीचे प्रकार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूर जिल्ह्यात महाविकास आघाडीचे उमेदवार जाहीर होताच चार मतदारसंघात बंडाचे झेंडे लागले आहेत. काही ठिकाणी नाराजी उफाळून आली आहे. कोल्हापूर उत्तरमधील उमेदवारीवरून तर जिल्हा काँग्रेस भवनावर दगडफेक करण्याचा प्रकार घडला. यामुळे महाविकास आघाडी अंतर्गत बंडखोरांची नाराजी दूर करण्याचे कडवे आव्हान निर्माण झाले आहे.



कोल्हापूर जिल्ह्यात महाविकास आघाडी अंतर्गत काँग्रेस पक्षाकडे सर्वाधिक पाच जागा गेल्या आहेत. कोल्हापूर उत्तर मतदारसंघात रात्री उशिरा राजेश लाटकर यांची उमेदवारी जाहीर झाली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सामाजिक अभियांत्रिकीकरण करण्याचा सल्ला राज्यातील काँग्रेस नेत्यांना दिला होता. त्यातूनच इतर मागासवर्गीय असलेले लाटकर यांना उमेदवारी देण्यात आली. राष्ट्रसेवा दलात जडणघडण झालेले लाटकर यांनी राष्ट्रवादीला रामराम करीत लोकसभा निवडणुकीवेळी काँग्रेसचे काम सुरू केले. त्यांना उमेदवारी दिल्यानंतर त्याचे संतप्त पडसाद उमटले. मध्यरात्री जिल्हा काँग्रेस भवनावर दगडफेक झाली. शहर अध्यक्ष सचिन चव्हाण समर्थकांनी हा प्रकार केल्याचे सांगितले जाते. तेथे हॅशटॅग चव्हाण पॅटर्न असे फलक रंगवले गेले. यावर सचिन चव्हाण यांनीही अजूनही वेळ गेलेली नाही उमेदवारी बदलावी अशी मागणी केली आहे. त्यामुळे कोल्हापूरचा तिढा आणखीनच वाढला आहे.


राधानगरी मतदारसंघात अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असलेले माजी आमदार के. पी. पाटील यांनी मशाल हाती घेतली आहे. नाराज झालेले त्यांचे मेहुणे ए. वाय. पाटील यांनी उमेदवारी अर्ज भरण्याची तयारी चालू केली आहे. येथे शिवसेना ठाकरे गट व काँग्रेसमध्ये नाराजी दिसत आहे. इचलकरंजी मतदारसंघ काँग्रेसकडून शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसकडे गेला आहे. येथे प्रदेश सचिव मदन कारंडे यांची उमेदवारी जाहीर झाली. स्पर्धेत असलेले गतवेळचे उमेदवार राहुल खंजिरे, शहर अध्यक्ष संजय कांबळे, स्मिता संजय तेलनाडे असे इच्छुक नाराज झाले आहे, तर राष्ट्रवादीचेच माजी आमदार अशोक जांभळे यांचे पुत्र सुहास जांभळे यांनी उमेदवारी अर्ज भरण्याची हालचाल सुरू केली आहे. चंदगडमध्ये शरदचंद्र पवार राष्ट्रवादीने नंदा बाभुळकर यांना रिंगणात उतरवले असले तरी आघाडीतील सर्वच इच्छुक नाराज झाले आहेत.

एकूणच कोल्हापूर जिल्ह्यात महा विकास आघाडीत गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. हा वाद अधिक वाढणार नाही असा विश्वास आघाडीचे नेते व्यक्त करीत आहेत. लोकसभा निवडणुकीपासून महाविकास आघाडीकडे लोकांचा कल असल्याने उमेदवारीची स्पर्धा जोरदार होती. त्यामुळे इच्छुकांच्या समर्थकांकडून काही प्रकार घडले आहेत. सर्वच इच्छुकांची समजूत घातली जात आहे. त्याला निश्चितपणे यश येईल आणि आम्ही महाविकास आघाडी म्हणून आम्ही एकसंघपणे निवडणुकीला सामोरे जाऊ, असा विश्वास काँग्रेसचे विधान परिषदेचे गटनेते सतेज पाटील यांनी व्यक्त केला आहे.

# ऐरोलीतील भाजपचे उमेदवार गणेश नाईक यांचा अर्ज दाखल

**नवी मुंबई : बातमीदार**


प्रचंड जनसमुदायाच्या उपस्थितीमध्ये वाजत-गाजत महायुतीच्या भाजपचे ऐरोली विधानसभा क्षेत्राचे उमेदवार आमदार गणेश नाईक यांनी आपला उमेदवारी अर्ज सोमवारी (दि.२८) दाखल केला.



ऐरोलीच्या सेक्टरच्या ४ स्व. काळू राघव सोनवणे मैदान येथून रॅली निघाली. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, आरपीआय (आठवले गट) आणि मित्रपक्षांचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आमदार श्रीकांत भारतीय, माजी खासदार डॉ.संजीव नाईक, माजी महापौर सागर नाईक, माजी महापौर सुधाकर सोनवणे, शिवसेनेचे नामदेव भगत, माजी ज्येष्ठ नगरसेवक अनंत सुतार, माजी स्थायी समिती सभापती नवीन गवते, भाजपचे जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, आमदार रमेश पाटील, आरपीआयचे सिद्राम ओव्हाळ, महेश खरे, युवा नेते संकल्प नाईक महायुतीचे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

वाजत-गाजत सर्व पक्षांचे झेंडे डौलाने फडकत होते. महायुतीच्या विजयाच्या घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला. मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी गणेश नाईक यांनी मंदिरांमध्ये दर्शन घेतले. महिला भगिनींनी त्यांचे औक्षण केले. नवी मुंबईला विकसित आणि सुरक्षित ठेवणारे नेतृत्व आमदारपदी कायम राहावे, अशा भावना या वेळी कार्यकर्ते आणि नागरिकांनी व्यक्त केल्या. जनतेच्या अभूतपूर्व प्रतिसादात ही रॅली सरस्वती विद्यालय येथे पोहचली. या ठिकाणी आमदार गणेश नाईक यांनी आपला अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर केला.

नवी मुंबईच्या विकासाला गती द्यायची आहे, असा निर्धार व्यक्त करून सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी एकदिलाने महायुतीच्या विजयासाठी काम करीत असल्याचे आमदार गणेश नाईक यांनी सांगितले.



**ठाणे : कोपरी पाचपाखडीतून एकनाथ शिंदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी केंद्रीय मंत्री रामदास आठवले, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक मुख्यमंत्र्यांचे वडील वडील संभाजी शिंदे, पत्नी लता शिंदे, सून वृषाली शिंदे, नातू रुद्रांश तसेच हेदेखील उपस्थित होते.**

## दाम्पत्यासह चौघांकडून दीड लाखांचा गांजा जप्त

**नवी मुंबई : बातमीदार**

एपीएमसी येथील एकता नगर झोपडपट्टीत विक्रीसाठी गांजाची पॅकिंग करताना पोलिसांनी चौघांना मुद्देमालासह अटक केली आहे. यात दोन पुरुष आणि दोन महिलांचा समावेश आहे. त्यांच्याकडून सुमारे एक लाख ६२ हजार रुपये किमतीचा ८१०० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे.




सध्या निवडणूक आचारसंहिता सुरू असल्याने पोलीस अलर्ट मोडवर आहेत. एकता नगर झोपडपट्टी परिसरात गस्त घालत असताना एका झोपडीत काही तरी संशयास्पद कृती सुरू असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानुसार त्यांची अधिक चौकशी केली असता दोन पुरुष व दोन महिला कागदाच्या पुड्या बांधत असल्याचे निदर्शनास आले.

विक्रीसाठी गांजाच्या पुड्या बांधल्या असल्याचे समजल्यावर त्यांना ताब्यात घेऊन पंचांच्या समक्ष पंचनामा करून ८१०० ग्रॅम गांजाचा साठा हस्तगत केला. त्याची किंमत एक लाख ६२ हजार रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, याप्रकरणी दीपक दयाराम निसाड (३६), हिना दीपक निसाड ( ३१), रोशन हिरा कराळे (३०) आणि रेखा रोशन कराळे या चौघांच्या विरोधात एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## मुंबईत वर्षभरात ४८५ कोटींचे अमली पदार्थ जप्त

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या दोन वर्षांत मेफेड्रोनचे (एमडी) सातहून अधिक कारखाने उद्ध्वस्त करणाऱ्या मुंबई पोलिसांनी पहिल्या नऊ महिन्यांत ४८५ कोटींचे अमली पदार्थ जप्त केले आहेत.

याप्रकरणी ८६० गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यात १०१० आरोपींना अटक करण्यात आले आहे. यावर्षी सर्वाधिक म्हणजे ४५०कोटी रुपयांचे एमडी पोलिसांनी विविध कारवायांमध्ये जप्त केले आहे.

मुंबई पोलिसांच्या कारवाईत अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या ५०९० व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी अमलीपदार्थ विरोधी कारवाईत घट झाली असून गेल्यावर्षी याच कालावधीत (सप्टेंबरपर्यंत) मुंबईत ६२ कोटी ५७ लाख रुपयांचे अमलीपदार्थ जप्त करण्यात आले होते.

त्या तुलनेत यावर्षी जप्त करण्यात आलेल्या अमली पदार्थांची किंमत अधिक आहे.

# शरद पवार गटातील नेते एकमेकांशीच भिडले!

## माध्यमांसमोरच हमरीतुमरी; अंतर्गत वाद चव्हाट्यावर; व्हिडीओ हायरल

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक आता महत्त्वाच्या टप्प्यावर आली आहे. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान वेगवेगळे पक्ष व उमेदवार एकमेकांवर टीकाटिपण्णी करीत आहेत. अशातच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातील दोन मोठे नेते आपसात भिडल्याचे समोर आले आहे. भिवंडीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या पॅम्प्लेटवर फोटो



न छापल्यामुळे नाराज झालेल्या अल्पसंख्यांक विभागाचे नेते युनूस शेख यांनी आव्हाडांसमोर नाराजी व्यक्त केली. दोघांमध्ये शाब्दिक बाचाबाचीदेखील झाली. या वादाचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे.

एएनआय या वृत्तसंस्थेने दोघांमधील वादाचा व्हिडीओ एक्स प्लॅटफॉर्मवर शेअर केला आहे. एएनआयने दिलेल्या माहितीनुसार, ही घटना रविवारी (दि.२७) मुंब्रा विधानसभा मतदारसंघात सायंकाळी घडली. आव्हाड त्यांचा प्रचार करीत असताना त्यांच्या पक्षाच्या राज्य अल्पसंख्याक विभागाचे उपाध्यक्ष युनूस शेख यांच्याबरोबर बाचाबाची झाली. दोघांमध्ये नेमका कशावरून वाद झाला हे स्पष्ट नसले तरी व्हिडीओत दिसतेय की, दोघेही हाणामारी करेपर्यंत एकमेकांशी वाद घालत होते. इतर कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांच्या मध्यस्थीनंतर दोघांमधील वाद निवळला.

# नागाव ग्रामपंचायतीला मिळाली तीन कोटींची थकबाकी परत

**उरण : वार्ताहर**

ओएनजीसीने उरण तालुक्यातील नागाव ग्रामपंचायतीला तीन कोटींचा मालमत्ता कराचा धनादेश अदा केला आहे. या मालमत्ता करामुळे ग्रामपंचायतीच्या विकासकामांना गती मिळणार आहे.

नागाव ग्रामपंचायत हद्दीतील प्रकल्पाकडे मालमत्ता कराची वार्षिक नऊ लाख ६५ हजार रुपये आकारणी करण्यात येते, मात्र उरण ओएनजीसी विविध कारणे पुढे करून २००० सालापासून २०१२पर्यंत कोट्यवधींची मालमत्ता कराची रक्कम भरण्यास चालढकल करीत होती. ओएनजीसीला मालमत्ता कराच्या थकीत रकमेचा भरणा करण्यासाठी वारंवार नोटिसा, स्मरणपत्र पाठविण्यात आली होती, मात्र त्यानंतरही ओएनजीसीने मालमत्ता कराची रक्कम भरण्यास तयारी दर्शवली नाही. त्यामुळे थकीत करासाठी नागाव ग्रामपंचायतीने उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

वर्षाकाठी ओएनजीसीकडून मालमत्ता करापोटी यापुढे ग्रामपंचायतीला ५४ लाख रुपये मिळणार असल्याची माहिती ग्रामपंचायतीने दिली. मालमत्ता कराच्या थकीत रकमेच्या वसुलीसाठी उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांचीही भूमिका महत्त्वाची ठरली. त्यांचे सहकार्य आणि ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्यांनी घेतलेल्या संघर्षाच्या पवित्र्यामुळेच ग्रामपंचायतीला न्यायालयात न्याय मिळाला आहे.



# नूतन विद्यालयात भव्य अभिजात मराठी अक्षर रांगोळी



**नवी मुंबई : बातमीदार**

नूतन विद्यालय कर्णिक शाळेच्या मैदानावर शनिवारी (दि.२६) अभिजात मराठी अक्षर रांगोळी काढून दीपोत्सव साजरा करण्यात आला.

यावर्षी मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्यामुळे शाळेतील कलाशिक्षक रांगोळीकार श्रीहरी पवळे यांच्या शालेय दीपोत्सव कार्यक्रमात अभिजात मराठी अक्षर रांगोळी साकारली. या रांगोळीसाठी ६०० किलो रांगोळी लागली. विद्यार्थ्यांच्या मदतीने तीन तासांत ही रांगोळी काढली.

पान १ वरुन

## पनवेलमध्ये महायुतीचे शक्तिप्रदर्शन

महापुरुषांच्या पुतळ्यास अभिवादन केले. त्यानंतर लोकनेते दि. बा. पाटील यांच्या संग्राम निवासस्थानी जाऊन 'दिबा'साहेबांना अभिवादन केले. या वेळी खासदार श्रीरंग बारणे, गोवा राज्याचे आमदार दयानंद सोपटे, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, पनवेल विधानसभा प्रमुख व जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, माजी नगरसेवक हरेश केणी, शिवसेनेचे महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, परेश पाटील, भाजपचे ज्येष्ठ नेते सी. सी. भगत, सुनील घरत, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते भीमसेन माळी, शिवदास कांबळे, सुरेश फडके, माजी महापौर कविता चौतमोल, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, आरपीआयचे नेते प्रभाकर कांबळे, मोहन गायकवाड, भाजप खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील यांच्यासह पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

मागील तीनही विधानसभा निवडणुकीत आमदार प्रशांत ठाकूर यांनी विरोधकांना पराभवाची धूळ चारली असून या वेळीही प्रचंड मताधिक्याने विजय मिळेल, अशी खात्री पनवेल मतदार संघातील मतदार नागरिक देत आहेत. आमदार प्रशांत ठाकूर यांनी लोकप्रतिनिधी म्हणून मतदारसंघात केलेल्या कामांचा आणि त्यांच्या कार्याचा गौरव संपूर्ण महाराष्ट्रात नावाजलेला आहे. लोकांच्या सुखदुःखात धावून जाणारा आणि दांडगा जनसंपर्क असलेले सर्वसामाजाचे प्रतिनिधी म्हणून आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे पाहिले जाते. सर्वांगिण आणि शाश्वत विकासासाठी आमदार प्रशांत ठाकूर लोकप्रतिनिधी म्हणून सातत्याने मोठे योगदान देत आहेत. त्यामुळे त्यांना सर्व समाजात मानणारा वर्ग मोठा आहे. या वेळीही मोठा विजय असावा अशी संपूर्ण मतदार संघातील जनतेची इच्छा आहे आणि त्यामुळे कार्यकर्ते आणि सर्व समाजातील नागरिक सज्ज झाल्याचे स्पष्ट चित्र आज अर्ज दाखल करताना दिसत होते.

या वेळी जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी महापौर कविता चौतमोल, माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, बबन मुकादम, चारुशीला घरत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, महिला मोर्चाच्या माजी तालुकाध्यक्षा रत्नप्रभा घरत, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांचीही भाषणे झाली. त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना जास्तीत जास्त मतांनी विजयी करण्यासाठी सर्वांनी सज्ज राहू या, असे आवाहन केले.

## पेणमध्ये आमदार रविशेठ पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल

या वेळी सभेत बोलताना खासदार धैर्यशील पाटील यांनी सांगितले की, महायुती सरकारने माता भगिनींना संसारात मानसन्मान मिळवून देण्याचे काम केले असून एवढ्यावरच न थांबता राज्यात महिला सक्षमीकरण योजना व लहान मुलांपासून वयोवृद्धांपर्यंत विविध योजना लागू केल्या असून या योजनांचा प्रचार प्रसार कार्यकर्त्यांनी करावयाचा आहे. यातून आपले उमेदवार रविशेठ पाटील यांचा मताधिक्य वाढणार आहे. विरोधकांना टोला लागवतना त्यांनी सांगितले की, फोनवरून नागरिकांना समस्या विचारून सोडवता येत नाहीत तर त्यासाठी रस्त्यावर उतरावे लागते. त्यासाठी आयुष्य खर्ची घालावे लागते हे आताच्या पुढाऱ्यांनी समजून घ्यावे, असा टोला त्यांनी लगावला. जी कामे प्रलंबित आहेत ती मार्गी लावण्याचे काम आगामी काळात करावयाची आहेत, या उद्देशाने निवणुकीला समोरे जाऊन जास्तीत जास्त मतांनी रविशेठ पाटील यांना निवणून आणावयाचे आहे, असे आवाहन या वेळी खासदार धैर्यशील पाटील यांनी कार्यकर्त्यांना केले.

आमदार अनिकेत तटकरे यांनी सांगितले की, महायुतीचे उमेदवार रविशेठ पाटील यांना जवळजवळ ७५ हजारांच्या मताधिक्क्याने निवडून आणावयाचे असून ज्याप्रकारे खासदार सुनील तटकरे यांनी पेणमधून ४० हजारांच्या वर लीड मिळवून देण्याचे काम रविशेठ पाटील यांनी व कार्यकर्त्यांनी केले. त्याप्रकारे राष्ट्रवादी काँगेसचे व महायुतीचे कार्यकर्ते यांनी झोकून देऊन काम करावयाचे आहे. आपले उमेदवार हे खंबीर असून आजच्या रॅली पाहता ते निवडून तर येणारच फक्त विजयाची नांदी बाकी असून विजयात मताधिक्य वाढविण्याचे काम आपल्या सर्वांना करावयाचे आहे, असे अनिकेत तटकरे यांनी सांगितले.

सकाळपासून तालुक्यातून महायुतीच्या कार्यकर्ते मोठ्या संख्येने पेण शहरात दाखल होत होते. यामुळे पेण नाका, अंतोरा रोड, महावीर मार्ग, राजू पोटे मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बाजार समिती परिसर गर्दीने फुलून गेला होता. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर निघालेली भली मोठी रॅली ही पेणकराची आकर्षण ठरली एक ते दीड किलोमीटर लांब असलेल्या या रॅलीमध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. या वेळी खान मोहल्ला, महावीर मार्ग, खाटीक आळी आदी ठिकाणी उमदेवार रविशेठ पाटील यांचे भव्य स्वागत करण्यात आले. या रॅलीमुळे पेण मतदार संघातून रविशेठ पाटील यांच्या विजय निश्चित असल्याचे बोलले जात आहे.

## रायगड जिल्ह्यात ३४ नामनिर्देशनपत्र दाखल

कर्जत विधानसभा मतदारसंघामध्ये सहा उमेदवारांनी सात नामनिर्देशन पत्र सादर केले असून ते पुढीलप्रमाणे.. महेंद्र सदाशिव थोरवे (शिवसेना), नमिता सुधाकर घारे (अपक्ष), किरण खंडू ठाकरे (भारतीय जनता पक्ष), किरण खंडू ठाकरे (अपक्ष), नितीन नंदकुमार सावंत (शिवसेना, उबाठा), श्रीराम बळीराम महाडिक (बहुजन समाज पार्टी), सुधाकर यादवराव घारे (अपक्ष).

उरण विधानसभा मतदार संघामध्ये चार उमेदवारांनी चार नामनिर्देशन पत्र सादर केले असून ते पुढीलप्रमाणे.. सुनील मारुती गायकवाड (बहुजन समाज पार्टी), मनोहर भोईर (शिवसेना, उबाठा), निलम मधुकर कडू (अपक्ष), श्री बाळकृष्ण धनाजी घरत (अपक्ष).

पेण विधानसभा मतदार संघामध्ये आज चार उमेदवारांनी चार नामनिर्देशन पत्र सादर केले असून ते पुढीलप्रमाणे..रवींद्र दगडू पाटील (भारतीय जनता पक्ष), देवेन मारुती कोळी (वंचित बहुजन आघाडी), अतुल नंदकुमार म्हात्रे यांच्या वतीने सूचक प्रतीक सदानंद म्हात्रे (शेकाप), प्रसाद केळुराम भोईर (शिवसेना, उबाठा).

अलिबाग विधानसभा मतदार संघामध्ये आज तीन उमेदवारांनी तीन नामनिर्देशन पत्र सादर केले असून ते पुढील प्रमाणे. महेंद्र हरी दळवी (शिवसेना), जुईली महेंद्र दळवी (अपक्ष), मंदार एकनाथ गावंड (अपक्ष).

श्रीवर्धन विधानसभा मतदार संघामध्ये तीन उमेदवारांनी तीन नामनिर्देशन पत्र सादर केले असून ते पुढीलप्रमाणे.. संतोष तानाजी पवार (अपक्ष), राजेंद्र मधुकर ठाकूर (इंडियन नॅशनल काँग्रेस), कृष्णा पांडुरंग कोबनाक (अपक्ष).

महाड विधानसभा मतदार संघामध्ये चार उमेदवारांनी चार नामनिर्देशन पत्र सादर केले असून ते पुढील प्रमाणे.. स्नेहल माणिक जगताप (शिवसेना, उबाठा), भरत मारुती गोगावले (शिवसेना), श्रीयश माणिक जगताप (शिवसेना, उबाठा), प्रज्ञा खांबे (अपक्ष).

जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघात नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया सुरू असून २९ ऑक्टोबर ही शेवटची तारीख आहे. या सर्व अर्जाची ३० ऑक्टोबरला छाननी करण्यात येणार असून ४ नोव्हेंबर २०२४ रोजी अर्ज मागे घेता येणार आहे. मतदान २० नोव्हेंबरला होत असून २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे.

## निवडक



### उबाठातर्फे लिना गरड यांचा अर्ज दाखल

**पनवेल :** विधानसभा पनवेल मतदारसंघ १८८साठी सोमवारी (दि.२८) शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे लिना गरड यांनी प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक यांच्या दालनात अर्ज दाखल केला. या वेळी उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी, महिला आघाडी उपस्थित होते.

### बिल्डर्स असोसिएशनतर्फे दिवाळी मिलन



**पनवेल :** सालाबादप्रमाणे यंदाही महाराष्ट्रीयन बिल्डर्स असोसिएशनचा (एचएचबीए)चा दिवाळी मिलन २०२४ समारंभ उलवे येथील श्री. रामशेठ ठाकूर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये उत्साहात झाला. या वेळी इंडिया सिमेंटच्या माध्यमातून उपस्थित बांधकाम व्यावसायिकांना त्यांच्या सिमेंटच्या संदर्भात माहिती देण्यात आली, तसेच त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या कार्यक्रमाला असोसिएशनचे अध्यक्ष शंकर म्हात्रे, महासचिव तुकाराम दुधे, खजिनदार बाळासाहेब देशमुख यांच्यासह मोठ्या प्रमाणात पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. यानिमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### पनवेल शहरातून दुचाकीची चोरी

**पनवेल :** शहरातील रामेश्वर मंदिर परिसरात उभी करून ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. शैलेश पंड्या यांनी त्यांची १५ हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची हिरो कंपनीची पॅशन प्रो दुचाकी (एमएच ४६ वाय २९५०) ही रामेश्वर मंदिर परिसरात उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली.

### पनवेल खर्च निरीक्षकपदी रमेशकुमार

**पनवेल :** विधानसभा पनवेल मतदारसंघ १८८साठी खर्च निरीक्षक म्हणून आयआरएस रमेशकुमार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने नागरिकांना, मतदारांना त्यांच्याशी भेटायचे असल्यास जेएनपीटी गेस्ट हाऊस येथे रोज सकाळी ९ ते १० या वेळेत भेटावे, तसेच दूरध्वनीद्वारे (७७३८२३९७००, ०२२-६७८१४६४३) या क्रमांकावर तसेच eo.[anvela².rran.{en.karjatgmail.bom या ई-मेल आयडीवर संपर्क साधावा, असे निर्देश निवडणूक विभागाच्या वतीने देण्यात आले आहे.

# विधानसभा निवडणुकीत जातीपातीचे राजकारण नको

## आमदार महेश बालदी यांचे विरोधकांना आवाहन | टाकीगाव परिसरातील कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश





**उरण : रामप्रहर वृत्त**

दिवंगत लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव विमानतळाला देण्यासाठी आपण संघर्ष केला. अंगावर केसेस घेतल्या, मात्र ज्यांनी पत्रकार परिषदा घेऊन नावासाठी विरोध केला, ते आज हुशाऱ्या करीत आहेत, अशी टीका आमदार महेश बालदी यांनी टाकीगावात पक्षप्रवेश कार्यक्रमावेळी केली. या विधानसभा निवडणुकीत जात, धर्म, भाषा, पंथाला थारा न देता विकासाच्या राजकारण करा, असे आवाहनही त्यांनी केले.

उरण विधानसभा मतदारसंघात आमदार महेश बालदी यांनी केलेल्या विकासावर प्रभावित होऊन टाकीगाव तसेच इतर परिसरातील शेकाप व उबाठा गटातील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यामध्ये ग्रामपंचायत सदस्य सुरज म्हात्रे, बोरखार अध्यक्ष शैलेश गावंड, उपाध्यक्ष अतुल ठाकूर, आकाश पाटील यांच्या नेतृत्वाखाली टाकीगावच्या माजी उपसरपंच शुभांगी जोशी, रोहित नाईक, परशुराम जोशी, आकाश घरत, दिपेश घरत, धनेश डाकी, कुंदन डाकी, बळीराम घरत, कोकण प्रांत वनवासी कल्याण आश्रमच्या अध्यक्ष सुनंदा कातकरी, खोपटे येथील राजिप शेळेचे चेअरमन देवीदास ठाकूर, मनिषा ठाकूर, बळीराम कातकरी, सुनील कातकरी, देविदास कातकरी, विष्णु कातकरी, शेकापचे गाव अध्यक्ष अत्माराम घरत, युवासेना शाखा उपाध्यक्ष ओमकार घरत, अत्माराम घरत, आकाश घरत, आनंदी घरत, खोपटा गावचे माजी अध्यक्ष निशांत ठाकूर, आकाश ठाकूर, दशरथ ठाकूर, प्रमोद डाकी, ताई डाकी, करण डाकी, युवराज डाकी यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांचे आमदार महेश बालदी यांनी पक्षाची शाल देऊन त्यांचे पक्षात स्वागत केले.

या वेळी भाजपचे उरण तालुकाध्यक्ष रवि भोईर, माजी जि.प. सदस्य विजय भोईर, जासई विभागीय अध्यक्ष गोपीनाथ म्हात्रे, महिला मोर्चा उरण तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे, अरुण नाईक, पं. स. माजी सदस्य दिशा पाटील, कामगार आघाडीचे अध्यक्ष जितेंद्र घरत, किसान मोर्चा उरण तालुकाध्यक्ष पांडूरंग पाटील, खजिनदार संदिप पाटील, सचिटणीस प्रसाद पाटील, समिर मढवी, माजी सरपंच अजित पाटील, धनेश गावंड, विशाखा ठाकूर, सहखजिनदार सुशांत पाटील, देवेंद्र पाटील, लक्ष्मी पाटील, मनोज ठाकूर, मधूकर नेवाळे, प्रशांत ठाकूर, निलेश पाटील, बळीशेठ घरत, आकाश पाटील, प्रकाश घरत, दिपक ठाकूर, कान्हा ठाकूर, सुधाकर नाईक, बाळा जोशी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी आमदार महेश बालदी यांनी येत्या पाच वर्षांत कोणत्याही बांधवांचे घर कुडाचे राहणार नाही, असे वचन दिले. मच्छीबंदर सुरू केले आहे. आपली सर्व कामे काँक्रीट आहे. त्यामुळे विरोधकांनी विकसाचे राजकरण करावे, असे म्हाणाले.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या खांद्याला खांदा लावून काम करणार -सुरेश फडके





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खासदार सुनील तटकरे यांच्या आदेशानुसार लोकसभेला श्रीरंग बारणे यांना निवडून आणण्यासाठी राष्ट्रवादीने प्रचार केला होता. त्याचप्रमाणे पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांना विधानसभेत चौथ्यांदा पाठवण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या खांद्याला खांदा लावून प्रचाराचे काम करू, असे प्रतिपादन राष्ट्रवादी पनवेल विधानसभा अध्यक्ष सुरेश फडके यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने प्रदेश सरचिटणीस भीमसेन माळी यांच्या अध्यक्षतेखाली आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विधानसभा प्रचाराचे नियोजन, प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक सुकापूर येथे आयोजित केली होती.

या बैठकीत पक्षांतर्गत मतभेद बाजूला ठेऊन आमदार प्रशांत ठाकूर यांना निवडून आणण्यासाठी सगळ्यांनी कामाला लागावे, असा सर्वानुमते निर्णय झाला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थिती लावून पदाधिकाऱ्यांचे आभार मानत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न सबका साथ, सबका विकासप्रमाणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली विकास करायचा आहे. महिला व बालकल्याण विभागाच्या मंत्री आदिती तटकरे या लाडकी बहीण योजना प्रभावीपणे राबवत आहेत. सर्वांनी एकदिलाने काम करावे. आपला आमदार म्हणून निश्चितच आपल्याला जे सहकार्य लागेल ते करण्याचे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थितांना दिले.

या वेळी राष्ट्रवादीचे पनवेल कार्याध्यक्ष चंद्रशेखर जळे, राजकुमार पाटील, पनवेल विधानसभा सचिव रवी म्हात्रे, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष एस. डी. हवालदार, महानगरपालिका जिल्हा युवाध्यक्ष मंगेश नेरूळकर, रोशन आंग्रे, किशोर पुरोहित, अर्जुन गवळी, रेखा दांडेकर, किशोर मुंडे, स्नेहल गुरव, नंदा काथारा, किरण अडाग्रे आदी उपस्थित होते.

## उरण मतदारसंघातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण



**उरण : प्रतिनिधी**

उरण विधानसभा मतदारसंघातील मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी दोन दिवसांचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. दोन सत्रात आयोजित करण्यात आलेल्या शिबिरातील पहिल्या सत्रात ८८८ तर दुसऱ्या सत्रात ८२६ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

दरम्यान प्रशिक्षण शिबिरादरम्यान गैरहजर अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करणार येणार असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. उद्धव कदम यांनी दिली.

उरण विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी जे.ए.कासार व सहाय्यक निर्णय अधिकारी डॉ.उद्धव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात कर्मचारी, अधिकाऱ्यांना निवडणूक कर्तव्यांची माहिती दिली, तसेच ईव्हीएम मशीन हाताळणीबाबतही तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले.

# नावडे येथे बाईक रॅलीतून मतदान जनजागृती

## पनवेल मनपाचा स्वीप कार्यक्रमांतर्गत उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजावावा याकरिता सोमवारी (दि.२८) महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशांनुसार महापालिकेच्या प्रभाग समिती 'अ'चा उपविभाग नावडे येथे बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले.

सहाय्यक आयुक्त स्मिता काळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बाईक रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये प्रभारी अधीक्षक अमर पाटील तसेच १२५हून अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. बाईक रॅली तळोजा फेज २मधील आसावरी सोसायटीपासून तळोजा फेज २पर्यंत काढण्यात आली. या अंतर्गत मतदान है सबकी जिम्मेदारी, छोडो आपने सारे काम पहले चलो करें मतदान, आपल्या मताचे दान आहे लोकशाहीची शान अशा घोषणा देत जनजागृती करण्यात आली.



# चोरीप्रकरणी विधी संघर्षग्रस्त बालक ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील जोशी आळी परिसरातून एका ॲक्टीव्हा स्कुटी चोरीप्रकरणी विधी संघर्षग्रस्त बालकाला गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने ताब्यात घेतले आहे.

शहरातील सहयोग नगर, जोशी आळी येथून ॲक्टीव्हा स्कुटी (एमएच ४६ एडब्ल्यू १११०) ही गाडी चोरी झाल्याने या चोरीचा तपास करीत होते. पनवेल पोलिसांसह गुन्हे शाखा कक्ष२ समांतर तपास करीत असताना वरीष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण फडतरे, उपनिरक्षक अभयसिंह शिंदे, हवालदार सागर रसाळ, प्रशांत काटकर, निलेश पाटील, पोलीस नाईकद अजिनाथ फुंदे, शिपाई लवकुश शिंगाडे यांना आधारे विधी संघर्षग्रस्त आरोपीची माहिती मिळाली. त्यानुसार त्याला बारवई येथून ताब्यात घेतले असता त्याने चोरी केल्याचे अधिक तपासात निष्पन्न झाले आहे.

# खांदा कॉलनी येथे आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दृष्टी फाउंडेशन संस्था, जीवनसागर सहकारी गृहनिर्माण संस्था, सिल्वर लीफ डायग्नोस्टिक सेंटर, आयरिस आय हॉस्पिटल व आयुष हिलिंग सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने जीवनसागर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कार्यालयात रविवारी (दि.२७) मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.

शिबिरात दात, रक्त, रक्तदाब, ईसीजी, डोळ्यांची तपासणी व ॲक्युप्रेशर उपचार करण्यात आले. दृष्टी फाउंडेशनचे अध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसचे पनवेल विधानसभा मतदारसंघ कार्याध्यक्ष किशोर देवधेकर, खारघर शहराध्यक्ष अनिल पाटील, जीवन सागर सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग म्हात्रे, उपाध्यक्ष चंद्रकांत चौधरी, खजिनदार अनिल पाटील, विवेक नार्वेकर, शाम भालेराव, सचिन नागटिळक, शहाजी काळे, श्रीहरी मिसाळ, सुरेश शेट्टी, शरद गायकवाड, एसजीडी स्कूलच्या नम्रता देवधेकर, आयुष हिलिंग सेंटरचे उमेश शर्मा, आयरिस आय हॉस्पिटलच्या डॉ. मानसी मोरे, जागृती तांडेल, समीक्षा पाटील, रश्मीला गरज, केळकाशा कुरेशी, विद्वान कांबळे, शिवाजी निकम, सिल्वर लिफ्ट डायग्नोस्टिक सेंटरचे डॉ. देवेंद्र चौधरी, संजय कामठेकर, आमले ज्ञानेश्वर, प्रतिभा भाग्यवंत, देवेंद्र चौधरी, मानसी पाटील, सुमन यादव, रोहित प्रसाद आदी उपस्थित होते.



शिबिरामध्ये आरोग्य सेवा दिल्याबद्दल दृष्टी फाउंडेशन संस्थेतर्फे सर्वांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

# राजे शिवराय प्रतिष्ठानतर्फे दुर्गदर्शन सोहळ्याचे उद्‌घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राजे शिवराय प्रतिष्ठानने आयोजित केलेला दुर्गदर्शन सोहळ्याचे उद्‌घाटन रविवारी (दि.२७) मोठ्या उत्साहात झाले. या वर्षी राजे शिवराय प्रतिष्ठानने श्रीदुर्ग पुरंदराची भव्य प्रतिकृती साकारली आहे. या सोहळ्यास शिवशंभू चरित्र अभ्यासक व लेखक निलेश भिसे यांच्या वाणीतून ज्वलज्वलंत हिंदुत्वाचे विचार उपस्थित सर्व प्रेक्षक वर्गाला ऐकायला मिळाले.

सोहळ्यास वसुधैव कुटुंबकम् आध्यात्म पीठ श्री मलंगडचे आचार्य प्रल्हाद महाराज शास्त्री, इंस्टा इन्फ्लुएंसर सार्थक सावंत, भोजन कट्टा मराठमोळा इंस्टा इन्फ्लुएंसर सचिन गायकवाड, संस्थापक राजे शिवराय प्रतिष्ठान महेश पवळे, राजे शिवराय प्रतिष्ठान पुणे अध्यक्ष शिवाजी खरात, शहराध्यक्ष अतुल गोणते, पनवेल नगर कार्यवाहक राष्ट्रीय स्वयंसेवक संघ दत्ताजी धोंडे, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पनवेल प्रमुख विक्रम वसंत पाटील आदी उपस्थित होते.







श्री पुरंदरगडाची प्रतिकृती सर्वांसाठी ५ नोव्हेंबरपर्यंत पाहता येणार आहे, तसेच मंगळवारी (दि.२९) स्त्री शक्ती संघटनेचा कार्यक्रम, गुरुवारी (दि.३१) भजन संध्या व ५ नोव्हेंबर रोजी दीपोत्सव साजरा करून या दुर्गदर्शन सोहळ्याची सांगता होणार आहे.







**पनवेल : विजयाची हॅट्ट्रिक करून आता विजयाचा चौकार मारण्यासाठी सज्ज असलेले महायुतीचे उमेदवार कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी अर्ज दाखल केला. या वेळी तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, शहराध्यक्ष अनिल भगत, माजी जि. प. अमित जाधव, माजी पं. स. भूपेंद्र पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, निलेश पाटील, केदार भगत आदींनी उपस्थित राहून महायुतीचा प्रचार करण्यास सुरुवात केली.**


## संपादकीय

# दुर्दैवी घटनेचे राजकारण

दिवाळी आणि सात नोव्हेंबरला असलेल्या छट पूजेमुळे सध्या उत्तर प्रदेशकडे जाणाऱ्या रेल्वेगाड्यांना मोठी गर्दी आहे. यानिमित्ताने रेल्वेने विशेष गाड्या, अतिरिक्त फेऱ्या आदी अनेक उपाययोजना करूनही रविवारी वांद्रे टर्मिनसमध्ये वांद्रे–गोरखपूर अंत्योदय एक्स्प्रेस पकडताना गोंधळ उडून दहा जणांना गंभीर दुखापत झाली. ही दुर्दैवी घटना गर्दीतील चेंगराचेंगरीमुळे नव्हे तर फलाटावर येणाऱ्या चालत्या गाडीत चढण्याच्या काही लोकांच्या प्रयत्नामुळे घडल्याचे स्पष्ट झाले आहे. असे असूनही विरोधकांनी मात्र त्याचेही राजकारण करण्याचा डाव साधला.

**जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश असल्याने भारतात चेंगराचेंगरीच्या घटना आजवर अनेकदा घडल्या आहेत. सर्वसाधारणपणे धार्मिक स्थळी मोठी गर्दी लोटत असल्यामुळे अशा घटना घडतात, पण त्याखेरीज सभासमारंभांच्या ठिकाणी तसेच रेल्वेस्थानकांवरही अशा घटना यापूर्वीही घडल्या आहेत. यापूर्वी २०१७ साली मुंबईतील एलफिन्स्टन रेल्वेस्थानकात प्रमाणाबाहेर गर्दी झाल्यामुळे दोन फलाटांना जोडणाऱ्या पुलाकडे जाणाऱ्या जिन्यावर चेंगराचेंगरी होऊन अनेक जण मृत्यूमुखी पडले होते, परंतु रविवारी वांद्रे टर्मिनसमध्ये घडलेली घटना ही गर्दीतील चेंगराचेंगरीपेक्षा चालत्या गाडीत चढण्याच्या प्रयत्नात काही जण फलाटावर पडल्याने गोंधळ उडून घडली आहे. अर्थातच अशा घटना या अतिशय दुर्दैवी व सगळ्यांच्याच मनाला चटका लावणाऱ्या ठरतात. विशेषत: रविवारसारख्या घटनेत गर्दीचे नियोजन करण्याचा आटोकाट प्रयत्न रेल्वे प्रशासनाकडून होऊनही काही लोकांच्या बेजबाबदार वर्तनामुळे सगळ्यांचाच जीव धोक्यात येतो. प्रवाशांनी फलाटावर येणाऱ्या रेल्वेगाडीचे दरवाजे बंद असताना खिडक्यांमधून डब्यांमध्ये शिरण्याचा प्रयत्न केला. यातील अनेकांनी रांग सोडून गाडीच्या आपत्कालीन खिडक्या आणि दरवाजांच्या दिशेने धाव घेतली होती. वास्तविक सध्या दिवाळीनिमित्त असलेली गर्दी लक्षात घेऊन मुंबई ते गोरखपूरदरम्यान दिवसाला एक्स्प्रेसच्या पन्नास फेऱ्या होत आहेत. असे असतानाही ही भीषण घटना घडली हे लक्षात घेतले पाहिजे. मुंबईत उत्तर भारतीयांची संख्या मोठी असून दिवाळी आणि छटपूजेसाठी हे लोक सध्या मोठ्या संख्येने गावी निघाले आहेत. एरव्हीही गोरखपुरसाठी नियमित सात गाड्यांच्या २८ फेऱ्या केल्या जातात. तर दिवाळी, छटपूजेला आणखी १० गाड्यांच्या २२ फेऱ्या सध्या केल्या जात आहेत. म्हणजे एकुणात यंदा १७ गाड्या आणि त्यांच्या ५० फेऱ्या असतानाही रविवारची दुर्दैवी घटना घडली, याला काय म्हणावे? सणांच्या निमित्ताने विशेष व्यवस्था केल्याची माहितीही पश्चिम रेल्वेने आदल्या दिवशीच दिली होती. प्रवाशांची गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने, त्यांना गाडीत बसायला पुरेसा वेळ मिळावा म्हणून वेळापत्रकाच्या दोन ते तीन तास आधीच रेल्वेगाडी फलाटावर लावली गेली होती. वांद्रे–गोरखपूर ही अंत्योदय एक्स्प्रेस असून पूर्णपणे विनाआरक्षित गाडी आहे. म्हणजे यात सर्व डबे जनरल असतात. आरक्षित गाड्यांसाठीही काही दिवसांपूर्वीच ॲडव्हान्स्ड रिझर्वेशनचा कालावधी चार महिन्यांवरून दोन महिन्यांचा करण्यात आला आहे. रविवारच्या घटनेनंतर १६ रेल्वेस्थानकांवरील फलाट तिकीट बंद करण्यात आले असून त्यातून फक्त ज्येष्ठ नागरिक व वैद्यकीय गरजा असलेल्यांना सूट देण्यात आली आहे. रेल्वेकडून गर्दीच्या नियोजनासाठी सातत्याने पावले उचलण्यात येत असून काही लोकांच्या बेजबाबदार वर्तनामुळे अशा दुर्दैवी घटना घडतात, पण त्यामुळे विरोधकांच्या हाती आयतेच कोलित सापडते, कारण त्यांना निव्वळ टीका करण्याचेच काम करायचे असते. टीका करताना त्यांनी किमान पातळी सोडू नये इतकीच सभ्यतेची अपेक्षा असते, पण सध्याच्या विरोधकांकडून तीही ठेवता येत नाही.**

# वैद्यकीय संशोधक वसंत रामजी खानोलकर



भारतातील वैद्यकीय संशोधनाचा पाया घालणारे व्यक्तिमत्व म्हणून वसंत रामजी खानोलकर यांची ओळख राहिलेली आहे. त्यांचा आज स्मृतीदिन आहे. कोकणातील एका छोट्या खेडेगावात गोमंतक मराठा समाजातील सुशिक्षित कुटुंबात १३ एप्रिल १८९५ रोजी झाला.

वसंत खानोलकर यांचे वडील रामजी धोंडो खानोलकर एक प्रतिष्ठित शल्यचिकित्सक होते. कंदाहारला गेलेल्या लॉर्ड रॉबर्टच्या विजयी सैन्यासोबत परतताना क्वेट्टा येथे ते विश्रांतीसाठी थांबले. तेव्हा क्वेट्टाचे वातावरण आणि परिसर रामजींना एवढे आवडले की त्यांनी तेथेच स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. दुर्दैवाने १९३५च्या भयानक भूकंपात रामजी आणि त्यांच्या परिवारातील १४ जण मृत्युमुखी पडले. रामजींचा वैद्यकीय वृत्तीसोबतच संस्कृत भाषेचा गाढा अभ्यास होता. त्यांच्याकडे अनेक मूल्यवान आणि दुर्मिळ पुस्तकांचा संग्रह होता. बहुधा वसंत खानोलकरांना वैद्यक आणि भाषा या विषयांची आवड वडिलांकडूनच मिळाली असावी.

वसंत खानोलकरांनी लहानपणीच डॉक्टर व्हायचे ठरवले होते. वयाच्या १७व्या वर्षी त्यांनी मुंबईच्या ग्रान्ट मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. येथेच ते सी.जी. पंडित यांना पहिल्यांदा भेटले. त्याच वर्षी ते इंग्लंडला रवाना झाले. लंडन विद्यापीठातून त्यांनी विज्ञान शाखेची पदवी संपादन केली आणि १९१८मध्ये वैद्यकीय पदवी मिळवली. १९२३मध्ये ते रोगनिदानशास्त्रात (पॅथॉलॉजी) एमडी झाले. या काळात त्यांनी मूलभूत विज्ञान आणि वैद्यकीय संशोधनात अमूल्य अनुभव मिळवला. ते सर्वात कमी वयाचे ग्रॅहम रिसर्च स्कॉलर होते. भारतात परत येऊन ते ग्रान्ट मेडिकल कॉलेजमध्ये पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना रोगनिदानशास्त्र शिकवू लागले. शिक्षणासाठी उपयुक्त विविध नमुन्यांचे संग्रहालय त्यांनी सुरू केले. रोगनिदानशास्त्राच्या पद्धतशीर शिक्षणाची सुरुवात त्यांनी केली. रोगनिदानशास्त्रातील संशोधनावरही त्यांनी विशेष भर दिला. पाश्चात्य देशातील वैद्यकीय शिक्षणाच्या तुलनेत भारतीय शिक्षण कमी पडू नये म्हणून त्यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमात अनेक बदल सुचवले. वैद्यकीय शिक्षणामध्ये मूलभूत विज्ञान, प्रायोगिक जीवशास्त्र (एक्सपेरिमेंटल बायोलॉजी), जीवरसायनशास्त्र, जीवभौतिकशास्त्र तसेच संख्याशास्त्र यांचे महत्त्वाचे स्थान त्यांनी ओळखले होते. हे तत्त्वज्ञान त्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये पसरविण्याचा प्रयत्न केला. खानोलकरांनी रोगनिदानशास्त्राचे शिक्षक या नात्याने या विषयाच्या अभ्यासाला त्यांनी नवीन दिशा दिली.

खानोलकरांनी सेठ जी.एस. मेडिकल महाविद्यालय व केईएम रुग्णालयात कामाच्या एका वेगळ्या परंपरेची सुरुवात केली. त्यामुळे या संस्थांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवर एक अत्युत्तम वैद्यकीय संस्था असण्याचा मान मिळाला. जैवभौतिकी, उपयोजित जीवशास्त्र इत्यादी विषयांची सुरुवात त्यांनी मुंबई विद्यपीठात केली. या कालावधीत खानोलकरांना कर्करोग आणि कुष्ठरोग यांच्या अभ्यासामध्ये विशेष कुतूहल व आवड निर्माण झाली. तेव्हा त्यांनी शिक्षकी पेशातून अंग काढून घेतले आणि टाटा मेमोरियल रुग्णालयात प्रमुख रोगनिदानतज्ञ म्हणून १९४१मध्ये ते रुजू झाले. त्यांनी कर्करोग, कुष्ठरोग, पुनरुत्पादनाचे शरीरशास्त्र, मानवी अनुवंशशास्त्र या विषयात संशोधन केले.

खानोलकर १९४१–१९५१ या काळात टाटा मेमोरियल रुग्णालयात अर्बुदाच्या (ट्युमर) तपासणीच्या कामात व्यस्त राहिले. त्यांच्या संशोधनाचा विषय भारतातील कर्करोग हा होता. भारतात कर्करोग आहे का, त्याचे कोणते प्रमुख प्रकार आहेत, हे शोधण्यासाठी त्यांनी रुग्णालयातील आकडेवारीचा अभ्यास केला. कर्करोगासाठी कारणीभूत काही घटक/सवयी, रोगपरिस्थितीविज्ञान (एपिडेमियॉलॉजी) यांचा त्यांनी अभ्यास केला. या संदर्भातील त्यांचे शोधनिबंध अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले. भारतातील कर्करोगासंदर्भातील त्यांच्या अग्रगण्य कामाबद्दल त्यांना १९४७मध्ये आंतरराष्ट्रीय कर्करोग युनियनचे (इंटरनॅशनल युनियन अगेन्स्ट कॅन्सर) सदस्यत्व बहाल करण्यात आले.

कर्करोगावर संशोधन करण्यासाठी भारतामध्ये तंत्रज्ञान आणि साधनसामग्री उपलब्ध व्हावी यासाठी त्यांनी केलेल्या मागणीचे मूल्यमापन एका खास सरकारी समितीने केले. या कामासाठी अमेरिकेहून इ. व्ही. कॉद्रे यांनाही बोलावण्यात आले होते. सर्वानुमते खानोलकरांना संशोधनासाठी एक राष्ट्रीय प्रयोगशाळा देण्यात यावी असे ठरले. अखेर १९५२मध्ये इंडियन कॅन्सर रिसर्च सेंटर (आयसीआरसी) सुरू करण्यात आले. यासाठी अनेक जागतिक संस्थांचे आर्थिक पाठबळ मिळाले, त्यात रॉकफेलर फाउंडेशन, जागतिक आरोग्य संघटना होत्या.

कर्करोगाव्यतिरिक्त खानोलकरांनी कुष्ठरोगावरही संशोधन केले. पुनरुत्पादनाचे शरीरशास्त्र यावर कार्य करण्यामध्ये खानोलकरांचा भर होता. या त्यांच्या उपक्रमातूनच इंडियन काउन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चने कुटुंबनियोजनाचा शास्त्रीय अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमली. खानोलकर सात वर्षे या समितीचे अध्यक्ष होते. इंडियन सोशिएशन ऑफ पॅथॉलॉजिस्ट ॲंड मायक्रोबायॉलॉजिस्ट या संघटनेची स्थापना त्यांनी केली. भारतात वैद्यकीय संशोधन सुरू करण्याचे श्रेय खानोलकर व त्यांचे जवळचे मित्र सी.जी. पंडित आणि बी.बी. दीक्षित यांना जाते. खानोलकर अनेक भाषा पारंगत होते. सहा भारतीय आणि चार युरोपियन भाषा ते बोलू आणि वाचू शकत होते.

भारत सरकारने खानोलकरांना पद्मभूषण देऊन गौरविले. ते इंडियन सोसिएशन ऑफ पॅथॉलॉजी ॲंड मायक्रोबायोलॉजी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, इंटरनॅशनल कॅन्सर रिसर्च कमिशनचे अध्यक्ष, इंडियन कॅन्सर रिसर्च सेंटरचे निदेशक, कर्करोग आणि कुष्ठरोगावरील जागतिक आरोग्य संघटनेच्या समितीचे सदस्य आणि मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू होते. नॅशनल अकादमी ऑफ सायन्सेसने खानोलकरांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वक्तृत्व स्पर्धा सुरू केली. कर्करोग आणि कुष्ठरोग यावर त्यांनी तीन पुस्तके आणि शंभरहून जास्त शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. खानोलाकारांचा मृत्यू मुंबईच्या केईएम रुग्णालयात २९ ऑक्टोबर, १९७८ रोजी झाला.

**–रजनी भिसे (मराठी विश्वकोष)**

# साहित्यिक व पटकथालेखक प्रभाकर तामणे



प्रभाकर तामणे लोकप्रिय झाले ते त्यांच्या विनोदी शैलीतल्या कथांमुळे. २९ ऑक्टोबर १९३१ रोजी त्यांचा जन्म झाला. गरवारे कॉलेजमधली मराठीची प्राध्यापकी सांभाळून त्यांनी अनेक कथा, कादंबऱ्या लिहिल्या.

'अशीच एक रात्र येते' हे त्यांचं फ्लॅशबॅक तंत्रातलं नाटक चांगलंच गाजलं होतं आणि त्याचे हिंदी, गुजराती, पंजाबी आणि कोकणी भाषांमध्ये अनुवादही झाले होते. त्यांनी चित्रपटांसाठी कथा–पटकथाही लिहिल्या. त्यांनी लिहिलेले एक धागा सुखाचा, मधुचंद्र, रात्र वादळी काळोखाची यांसारखे मराठी चित्रपट गाजले. तसंच त्यांच्या कथेवर राज कपूरने काढलेला 'बीवी ओ बीवी' हा विनोदी सिनेमाही गाजला होता.

अनामिक नाते, छक्केपंजे, एक कळी उमलताना, घडीभरची वस्ती, हुंडा पाहिजे, जीवनचक्र, लाइफमेंबर, पुनर्मीलन, सांगू नको साजणी, मध्यरात्री चांदण्यात, तो स्पर्श... तो सुगंध, दिनू, हिमफुलांच्या देशात, हा स्वर्ग सात पावलांचा, माझ्या बायकोचा नवरा, मध्यरात्री चांदण्यात, रात्र कधी संपूच नये, संगीत प्रेमबंधन असं त्यांचं लेखन प्रसिद्ध आहे.

**(साभार : बाईट्स ऑफ इंडिया)**

## बदलते तंत्रज्ञान

# 'जिओ'ची ऑफर; वर्षभरासाठी मोफत हायस्पीड इंटरनेट

काही काळापासून खासगी टेलिकॉम कंपन्यांनी आपल्या रिचार्जच्या किमती वाढवल्यामुळे




ग्राहक नाराज आहेत, पण फास्ट इंटरनेट सेवा मिळतात, त्यामुळे ग्राहक वाढीव किमतीत रिचार्ज खरेदी करत आहेत. यात रिलायन्स जिओ कंपनीच्या ग्राहकांचाही समावेश आहे. किंमत जास्त असली तरी फास्ट सेवा मिळते. त्यामुळे ग्राहक समाधानी आहेत. दरम्यान, 'जिओ'ने आपल्या ग्राहकांसाठी दिवाळीनिमित्त एक उत्तम ऑफर आणली आहे. या दिवाळी धमाका ऑफरमध्ये 'जिओ' आपल्या ग्राहकांना वर्षभर मोफत इंटरनेट सुविधा देत आहे.

रिलायन्स जिओची नवीन दिवाळी धमाका ऑफर तुमच्या सणासुदीला आणखी खास बनवणार आहे. तुम्ही 'जिओ'च्या या नवीन ऑफरचा लाभ घेतला, तर तुम्हाला एकाच वेळी संपूर्ण वर्षभर डेटा संपवण्याचे टेंशन राहणार नाही. या ऑफर अंतर्गत तुम्हाला हाय स्पीडमध्ये ५जी डेटा मिळेल.


**ऑफरचा लाभ कसा घ्यायचा?**

रिलायन्स जिओची नवीन दिवाळी धमाका ऑफर रिलायन्स डिजिटल किंवा मायजिओ स्टोअरमधून खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी आहे. जर तुम्ही 'जिओ'च्या या दोन प्लॅटफॉर्मवरून २० हजार रुपयांची खरेदी केली, तर कंपनी तुम्हाला एक वर्षासाठी मोफत डेटा मिळेल. या ऑफरचा लाभ घेण्याची अंतिम तारीख ३ नोव्हेंबर आहे. याशिवाय, कंपनी दिवाळी ऑफरमध्ये ग्राहकांना केवळ २,२२२ रुपयांमध्ये तीन महिन्यांचा जिओ एअर फायबर प्लॅन देत आहे.

**कंपनी ग्राहकांना १२ कुपन देईल**

दिवाळी ऑफरमध्ये जिओ आपल्या एअर फायबर ग्राहकांना नोव्हेंबर २०२४ ते ऑक्टोबर २०२५पर्यंत ॲडव्हान्स रिचार्जमध्ये एकूण १२ कुपन प्रदान करेल. ग्राहकांना मिळालेली हे कुपन ॲक्टिव्ह जिओ एअर फायबर प्लॅनच्या बरोबरीची असेल. कुपन रिलायन्स डिजिटल, माय जिओ ॲप, जिओ पॉइंट किंवा जिओ मार्ट डिजिटल एक्सक्लुझिव्ह स्टोअरवर रिडीम केले जाऊ शकतात, असे सांगण्यात आले आहे.

# जागतिक स्ट्रोक दिवस



## निमित्त

स्ट्रोकचे गंभीर स्वरूप आणि उच्च दर यावर जोर देण्यासाठी दरवर्षी २९ ऑक्टोबर रोजी जागतिक स्ट्रोक दिवस पाळला जातो. स्ट्रोकच्या प्रतिबंध आणि उपचारांबद्दल जागरूकता वाढवण्यासाठीदेखील हा दिवस पाळला जातो.

जगभरात, ब्रेन स्ट्रोक हे मृत्यूचे दुसरे प्रमुख कारण आणि अपंगत्वाचे तिसरे प्रमुख कारण आणि मृत्यूचे दुसरे प्रमुख कारण आहे. दरवर्षी अंदाजे १८ लाख लोकांना पक्षाघाताचा त्रास होतो. असे नमूद केले आहे की, कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये, ज्यात भारताचा एक भाग आहे, स्ट्रोकमध्ये १०० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे, तर विकसित देशांमध्ये ४२ टक्क्यांनी घट झाली आहे.

भारतातील स्ट्रोकचे सरासरी प्रमाण दर एक लाख (१,००,०००) लोकसंख्येमागे १४५ आहे. संशोधकांच्या मते, दर मिनिटाला तीन भारतीयांना पक्षाघाताचा झटका येतो. जरी वयोवृद्ध वयोगटातील लोकांना ब्रेन स्ट्रोकचा जास्त त्रास होत असला तरी, तो कोणत्याही वयात कोणालाही होऊ शकतो. जोखीम घटक समजून घेणे आणि लक्षणे ओळखणे ब्रेन स्ट्रोक टाळण्यास मदत करू शकते. त्याच वेळी लवकर निदान आणि उपचार मिळाल्याने पूर्ण बरे होण्याची शक्यता वाढते.

जागतिक स्ट्रोक दिवसाची स्थापना २९ ऑक्टोबर २००४ रोजी कॅनडातील व्हँकुव्हर येथील वर्ल्ड स्ट्रोक कॉँग्रेसमध्ये करण्यात आली. नंतर २००६मध्ये जनजागृतीसाठी हा दिवस घोषित करण्यात आला. २००६मध्ये वर्ल्ड स्ट्रोक फेडरेशन आणि इंटरनॅशनल स्ट्रोक सोसायटीच्या विलीनीकरणासह जागतिक स्ट्रोक संघटना तयार करण्यात आली. तेव्हापासून, वर्ल्ड स्ट्रोक ऑर्गनायझेशन वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर जागतिक स्ट्रोक डेच्या व्यवस्थापनाची आणि समर्थनाची काळजी घेत आहे.

जगभरातील स्ट्रोक डेटाच्या प्रगतीमुळे १९९०च्या दशकात जागतिक स्ट्रोक दिनाचा आग्रह अस्तित्वात आला. २०१०मध्ये जागतिक स्ट्रोक ऑर्गनायझेशनने जागरुकतेच्या अभावामुळे आणि प्रत्येकासाठी निदान आणि उपचारांची योग्य उपलब्धता नसल्यामुळे प्रचलित मृत्यू आणि अपंगत्व रोखण्यासाठी स्ट्रोकला सार्वजनिक आरोग्य आणीबाणी घोषित केले. असा अंदाज आहे की, २०१६मध्ये, स्ट्रोकमुळे (अकाली मृत्यूचे एक उपाय) ११ कोटी ६० लाख संभाव्य वर्षांचे जीवन मृत्यू आणि अपंगत्वामुळे गमावले गेले.

या वर्षी जागतिक स्ट्रोक दिनाची थीम GreaterThanStroke सक्रिय आव्हान आहे. ही थीम स्ट्रोकबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि स्ट्रोक प्रतिबंध आणि पुनर्वसनावर कारवाई करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी खेळाच्या भावनिक शक्तीचा लाभ घेते.

खेळाला सार्वत्रिक आकर्षण आहे जे भौगोलिक, सांस्कृतिक आणि लोकसंख्याशास्त्रीय सीमांच्या पलीकडे आहे. सर्व स्तरातील लोक कोणत्या ना कोणत्या स्वरुपात खेळात गुंतलेले असतात. जागरुकतेसाठी एक व्यासपीठ म्हणून खेळाचा फायदा घेऊन, आम्हाला विश्वास आहे की संदेश व्यापक आणि वैविध्यपूर्ण प्रेक्षकांपर्यंत पोहचेल.

**(छाया : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!



**मुरूड : दिवाळीमध्ये ग्रामीण भागात दगड, वीटा, मातीपासुन किल्ले तयार केले जाते, मात्र शहरामध्ये किल्ले बनविण्यात अनेक समस्या निर्माण होत असल्यामुळे पीओपीपासून तयार केलेले रेडीमेंट किल्ले विक्रीस असतात. त्यांना मागणी वाढली आहे.**

## आरोग्य प्रहर

# नियमित दोन किमी वेगाने चालणे आरोग्यास फायदेशीर

वेगाने चालणे हा व्यायाम सहज करता येण्यासारखा आहे. वेगाने चालण्याचे अनेक फायदे आहेत. तुमच्या दैनंदिन



दिनचर्येमध्ये दोन किलोमीटर वेगाने चालणे समाविष्ट केल्यास तुमचे आरोग्य लक्षणीयरीत्या सुधारू शकते, परंतु योग्य तंत्र आणि संभाव्य धोक्यांची जाणीव महत्त्वाची आहे.

दिल्लीच्या सी. के. बिर्ला हॉस्पिटलमधील एचओडी–फिजिओथेरपी विभागाचे डॉ. सुरेंद्र पाल सिंग यांनी सांगितले की, नियमित वेगात चालणे हे सर्वांगीण आरोग्याला चालना देण्यासाठी एक प्रभावी साधन आहे. आपण दररोज अशी कृती केल्यास त्याचा आपल्या शरीरावर कसा परिणाम होतो ते जाणून घेऊ.

हृदय व श्वासोच्छ्वासाला चालना : वेगाने चालण्यामुळे तुमचे हृदय आणि फुप्फुसे मजबूत होतात. त्यांची कार्यक्षमता सुधारणे आणि तुमच्या कार्य करण्याची क्षमता वाढवण्याला त्यामुळे चालना मिळते.

रक्तदाब नियमन : या व्यायाम प्रकारामुळे रक्तदाबावर नियंत्रण राहते आणि हृदयरोगाचा धोका कमी होतो.

सांध्यांची लवचिकता सुधारते : वेगात चालण्याने तुमच्या सांध्यांची लवचिकता सुधारून, कडकपणा कमी होतो.

मधुमेह व्यवस्थापन : वेगात चालण्याच्या कृतीने रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यास मदत मिळते. मधुमेहींसाठी ही बाब स्वाभाविकत: फायदेशीर ठरते.

वजन व्यवस्थापन चमत्कार : कॅलरी बर्न करणे, वजन कमी करणे किंवा निरोगी वजन व्यवस्थापन यांसाठी वेगात चालण्यामुळे योगदान मिळेल.

सर्वसाधारण शिफारस म्हणून डॉ. सिंग आठवड्यातून पाच वेळा ३० मिनिटे वेगाने चालण्याच्या आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यास सांगतात. हा कालावधी सामान्यत: चांगले आरोग्य राखणे व या व्यायामाचे फायदे मिळविणे यासाठी पुरेसा असतो.

वेगवान चालण्याने अनेक फायदे होत आहेत; परंतु जर तुम्ही योग्य प्रकारे चालत नसाल, तर त्याचे विचारात घेण्यासारखे संभाव्य तोटेही आहेत. तुमच्या क्षमतेपेक्षा तुम्ही अधिक वेगाने चालल्यास तुमच्या हृदयाची गती अधिक वाढू शकते. पोषक घटकांच्या अपुऱ्या सेवनामुळे तुम्हाला थकवा येऊ शकतो. जलद चालण्याची दिनचर्या सुरू करण्याआधी, विशेषत: जर तुम्हाला गंभीर संधिवात, हृदयाच्या समस्या किंवा शस्त्रक्रियेनंतर बरे होण्याच्या मार्गावर असाल किंवा यांसारख्या आरोग्य स्थिती आधीपासूनच असतील, तर सुरक्षेबाबतच्या टिप्सचे पालन करा.

# अलिबागमध्ये महायुतीचे जोरदार शक्तिप्रदर्शन

## आमदार महेंद्र दळवी यांनी भरला उमेदवारी अर्ज | खासदार सुनील तटकरे यांची उपस्थिती

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग-मुरूड विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेचे उमेदवार विद्यमान आमदार महेंद्र दळवी यांनी सोमवारी (दि. २८) आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी तथा अलिबाग प्रांताधिकारी मुकेश चव्हाण आंच्याकडे सादर केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, शिवसेना जिल्हा प्रमुख राज केणे, भाजपचे विधानसभा मतदारसंघ समन्वयक ॲड. महेश मोहिते, मानसी दळवी या वेळी उपस्थित होते.



या वेळी महायुतीने अलिबागमध्ये विराट रॅली काढून जोरदार शक्तिप्रदर्शन केले. आमदार महेंद्र दळवी सोमवारी आपला उमेदवारी अर्ज सादर करणार आहेत, असे जाहीर करण्यात आले होते. त्यामुळे सकाळपासूनच कार्यकर्ते अलिबाग शहरात आले होते. गाड्यांना शिवसेनेचा भगवा झेंडा लावून कार्यकर्ते आले होते. कार्यकर्ते भगवेझेंडे घेऊन रॅलीमध्ये सहभागी झाले होते. अलिबागमधील सर्व रस्त्यांवर भगवे झेंडे लावलेल्या गाड्या दिसत होत्या. भगवा झेंडा घेऊन कार्यकर्त्यांचे जथ्थे अलिबागमध्ये येत होते. त्यामुळे अलिबाग भगवे झाले होते.

जनरल अरूणकुमार वैद्य हायस्कूल जावळ सभा आयोजित करण्यात आली होती. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे आपला उमेदवारी अर्ज सादर केल्यानंतर आमदार महेंद्र दळवी सभेच्या ठिकाणी आले. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. या वेळी आमदार महेंद्र दळवी यांनी उपस्थितांना संबोधीत केले.

मागील पाच वर्षे जनतेची सेवा करण्याची संधी मला मिळाली. मी मतदारसंघात विकास कामे केली आहेत. त्याचा फायदा मला होईल. मतदार मला पुन्हा निवडून देली. लोकसभा निवडणूकीत खासदार सुनील तटकरे यांना अलिबाग विधानसभा मतदारसंघात आघाडी मिळाली होती त्यापेक्षा जास्त मतांनी मी निवडून येणार आहे. २३ नोव्हेंबर रोजी विजयाचा गुलाला आपणच अधळणार आहोत, असे आमदार महेंद्र दळवी म्हणाले.

भाजप आमदार महेंद्र दळवी यांच्या सोबतच आहे. महायुती भक्कम आहे. त्यामुळे महेंद्र दळवी यांचा विजय निश्चत आहे, असे ॲड. महेश मोहिते म्हणाले. शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते एकदिलाने काम करत आहेत. आमदार महेंद्र दळवी यांना जनतेचा आशीर्वाद आहे त्यामुळे आमदार महेंद्र दळवी निवडून येणार आहेत, असे ॲड. विलास नाईक म्हणाले.

भाजपचे अलिबाग शहर अध्यक्ष ॲड. अंकित बंगेरा, राष्ट्रवारी काँग्रेसचे अलिबाग-मुरूड विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष अमित नाईक, हर्षल पाटील, अनंत गोधळी, सुनील दामले, अश्रफ घट्टे आदी या वेळी उपस्थित होते.

# प्रचार साहित्यावर मुद्रक व प्रकाशकांचे नाव छापणे बंधनकारक -जिल्हाधिकारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या निवडणूक आदर्श आचारसंहिता काळात संबंधित मुद्रक प्रिंटर्सनी प्रचार साहित्य तसेच इतर छपाईबाबत विशेष काळजी घेऊन आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१'च्या 'कलम १२७ क'द्वारे निवडणूक पत्रकांच्या छपाईवर आणि प्रसिद्धीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. याकडे सर्व राजकीय पक्ष, निवडणूक लढविणारे उमेदवार आणि मुद्रणालयांच्या चालक व मालकांचे लक्ष वेधण्यात आले आहे.

हाताने नक्कल काढण्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रक्रियेने छापण्यात किंवा अनेक प्रती काढण्यात आलेले निवडणुकी संबंधीचे प्रत्येक पत्र, हस्तपत्रक, घोषणाफलक किंवा भित्तीपत्रक यांच्या दर्शनी भागावर मुद्रकांचे आणि प्रकाशकाचे नाव व पत्ता प्रसिध्द करणे बंधनकारक आहे. असे कोणतेही पत्रक मुद्रकांने इच्छुक प्रकाशकाकडून त्यांनी ते स्वत: स्वाक्षरीत केलेले आहे, त्या व्यक्तिला व्यक्तिश: ओळखतील अशा दोन व्यक्तींनी साक्षांकित केलेल्या त्या प्रकाशकांची ओळख पटवणारे प्रतिज्ञापत्र (दोन प्रती मध्ये) घेणे अत्यावश्यक आहे, असे जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले तसेच दस्तऐवज छापण्यात आल्यावर मुद्रकांने प्रतिज्ञापत्राची एक प्रत व पत्रक इत्यादींच्या चार प्रती संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे तीन दिवसाच्या आत सादर कराव्यात. या सर्व प्रती मिडीया सेलमधील कक्षात जमा कराव्यात.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना सहा महिन्यांपर्यंत कारावास किंवा रुपये दोन हजारांपर्यंत दंडाची अथवा या दोन्ही शिक्षा होऊ शकतात अशी तरतूद या नियमात असल्याचेही जिल्हाधिकारी जावळे यांनी स्पष्ट केले.

# पिस्तुल विक्रीसाठी आलेला ताब्यात

**खोपोली, मोहोपाडा : प्रतिनिधी**

पिस्तुल विक्रीसाठी आलेल्या सौरभ जगदीशप्रसाद आर्या (वय २३, रा. रिस, मोहपाडा) याला स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने सापळा रचत चौक येथून अटक केली आहे. त्याच्याकडून एक पिस्तूल आणि दोन जिवंत काडतूस पोलिसांनी जप्त केले आहेत. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला एक व्यक्ती पिस्तुल विक्रीसाठी चौक येथे येणार असल्याची पक्की खबर गोपनीय सूत्रांकडून मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी त्याला झडप टाकून ताब्यात घेतले. त्याच्याजवळ एक पिस्तुल आणि दोन जिवंत काडतुसे आढळली. पिस्तूल आणि काडतूस विक्रीसाठी आल्याचे कबूल केल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. पुढील तपास सुरू आहे.

# मोरे महाविद्यालयातर्फे आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**रोहे : प्रतिनिधी**

एम. बी. मोरे फाउंडेशनचे कला वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय धाटाव येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएनएस) विभागामार्फत शुक्रवारी (दि. २५) आदिवासीपाडा आंबेवाडी, रा.जी.प शाळा आंबेवाडी येथील विद्यार्थ्यांना दीपावलीनिमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांना त्यांचे सामाजिक जबाबदारी आणि समाजातील अपेक्षित घटकांच्या समस्यांची जाणीव करून देणे हा राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा मुख्य हेतू या उपक्रमा मार्फत साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. महिला महाविद्यालयाच्या एनएसएस मार्फत शैक्षणिक साहित्यचे संकलन करून दीपावलीनिमित्त आंबेवाडी आदिवासीवाडी ३ ते ६ वयोगटातील १५ मुलांना, रा.जी.प शाळा आंबेवाडी येथील ६२ विद्यार्थ्यांना वही, पेन, पेन्सिल आदी वस्तूंचे किट प्राध्यापक आणि विद्यार्थीनीकडून वितरित केले.

कार्यक्रमस्थळी एम बी मोरे फाउंडेशन संचालक अशोक मोरे, अंगणवाडी आदिवासी पाडा शिक्षिका गीता लोखंडे, निलेश गर्जे, मुख्याध्यापक आणि राजिप शाळा आंबेवाडीचे शिक्षक गर्जे मॅडम, अमोल शिंदे, महिला महाविद्यालयातील प्रा.अक्षता ठाकूर, प्रा. प्रज्ञा शिर्के आणि ८८ विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख मयुर पाखर आणि नेहा गुप्ता (तृतीय वर्ष कला) यांनी केले.




# हरिहरेश्वर हिट अँड रन प्रकरणातील आणखी तीन आरोपींना अटक

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर हिट अँड रन प्रकरणातील आणखी तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

हरिहरेश्वर या पर्यटनस्थळी २० ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास ममता होमस्टेचे मालक अभी धामणस्कर व त्या ठिकाणी आलेले पर्यटक यांच्यामध्ये रूमच्या भाड्यावरून वाद झाला होता. त्यानंतर सदर पर्यटकांच्या गाडीतील एक तरुण गाडी खालीच राहिल्याने त्याला गावकऱ्यांनी पकडून ठेवले होते. याचाच राग मनात धरून सदर गाडीमध्ये बसलेले सर्व आरोपी हे पुन्हा हरेश्वर येथे आले व आमच्या साथीदाराला सोडा नाहीतर तुम्हाला जीवे ठार मारू अशी धमकी देऊ लागले.

त्यानंतर अभि धामणस्कर यांच्याजवळ हमरातुमरी सुरू झाल्यानंतर अभी धामणस्कर यांची बहीण ज्योती धामणस्कर हीदेखील त्या ठिकाणी दाखल झाली. पर्यटकांनी रूम न दिल्याचा राग मनात धरून गाडी जोर जोराने मागेपुढे करत ज्योती धामणस्कर हिला धक्का मारला व ती गाडीच्या खाली पडली असता तिच्यावरून जबरदस्तीने गाडी घेऊन गेले व तिला जीवे ठार मारले. यानंतर ग्रामस्थांच्या ताब्यात असलेल्या एका आरोपीला गावकऱ्यांनी पोलिसांच्या स्वाधीन केले. व सर्व आरोपींविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या वेळी ग्रामस्थांनी पकडून दिलेला एक आरोपी व श्रीवर्धन बस स्थानक परिसरात सदर गाडी मधील दोन आरोपी सकाळी आढळून आले. या तिघांना पोलिसांनी अटक केल्यानंतर उर्वरित आरोपी पुणे येथे फरार झाले होते, परंतु श्रीवर्धन पोलिसांचे पथक त्या ठिकाणी गेले असता ते पुणे येथून फरार झाले. आरोपी काही दिवस पुणे जिल्ह्यातील दौंड येथे गेल्याची बातमी मिळाली होती. पोलिसांनी त्या ठिकाणीदेखील शोध घेतला. परंतु आरोपी तेथून देखील पसार झाले होते. त्यानंतर आरोपी इंदापूर व अकोला येथे गेल्याची बातमी पोलीस पथकाला मिळाली होती. त्याप्रमाणे पोलीस पथकाने इंदापूर व अकोला येथे जाऊन देखील शोध घेतला होता, परंतु आरोपी सापडून आले नव्हते. आरोपी हे आपल्या घरी आल्याची खबर पोलिसांना लागल्यानंतर पोलिसांनी सदर आरोपींना त्यांच्या घरून ताब्यात घेतले आहे.

यामध्ये आकाश राजू उपरवट, (वय २६ राहणार, कासरवाडी ता. हवेली जि. पुणे), सचिन सुभाष जमादार, (वय २७ वर्षे, रा. कासारवाडी, हवेली, जिल्हा पुणे), आलीम मेहबूब नागोर (वय २२ वर्षे रा. कासारवाडी, हवेली, पुणे) यांना राहत्या घरातून पोलिसांनी ताब्यात घेऊन श्रीवर्धन या ठिकाणी आणले आहे.

तीन आरोपींचा शोध घेऊन श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी निरीक्षक उत्तम रिकामे सहाय्यक निरीक्षक एन. एस. लकडे, उपनिरीक्षक एस.टी. लहाने, सोनवणे, निकाळजे यांनी महत्त्वाची कामगिरी बजावलेली आहे.

# संजय पोळ यांना पुरस्कार



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील भागाड गावचे रहिवाशी तथा निजामपूर ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक संजय पोळ यांना उल्लेखनीय कार्याबद्दल आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ग्रामसेवक संजय आप्पा पोळ यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे. ग्रामसेवक संजय आप्पा पोळ हे माणगाव तालुक्यातील निजामपूर ग्रामपंचायतीत ग्रामसेवक पदावर काम करीत आहेत. रायगड जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींमध्ये त्यांनी ग्रामसेवक म्हणून चांगले काम केले आहे.

# एक हजार दिवाळी शुभेच्छा कार्ड वाटप; नागरिकांना मतदान करण्याचे आवाहन

## ■ वडगाव राजिप शाळेचा उपक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद वडगाव यांनी एक हजार शुभेच्छा कार्ड देऊन यामध्ये मतदान करण्याविषयी आवाहन करण्यात आले.

या वर्षी दिवाळीच्या सणाच्या उत्सवात विधान सभेच्या निवडणूकीचे पडघम वाजत आहे. स्विप कार्यक्रमांतर्गत अभिनव मतदान जनजागृती करण्यासाठी रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, वडगाव नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवत असल्यामुळे त्यांनी एक हजार शुभेच्छा कार्ड देऊन यामध्ये मतदान करण्याविषयी आवाहन करण्यात आले.



कार्यक्रमाचे आयोजन गटशिक्षणाधिकारी खालापूर-कैलास चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. मुख्याध्यापक सुभाष राठोड यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला. पनवेल तालुक्यातील ज्योती भोपी, म्हात्रे, मनोज म्हात्रे व योगिनी वैदू यांनी गाणी सादर करून मतदानाचे आवाहन केले.

**वडगाव शाळा व शाळेचे सुभाष राठोड व सर्व शिक्षक नेहमीच वेगवेगळे यशस्वी उपक्रम राबवत असतात. १००० शुभेच्छा कार्डाच्या माध्यमातून मतदान जनजागृती ही अभिनव संकल्पना सुंदर व कौतुकास्पद आहे.**
**-कैलास चोरमले, गटशिक्षणाधिकारी, खालापूर**

**मला नाविन्याची व नाविन्यतापूर्ण उपक्रम राबविण्याची आवड आहे तसेच या कामासाठी विद्यार्थी, शिक्षक पालकांचा पूर्ण सहभाग व पाठींबा असतो.**
**-सुभाष राठोड, मुख्याध्यापक**

# रायगडात भातकापणींच्या कामाला वेग

**अलिबाग : प्रतिनिधी**

परतीच्या पावसाने विश्रांती घेतल्यानंतर रायगड जिल्हयात भातकापणीच्या कामाला पुन्हा एकदा वेग आलाय. बेभरवशी पावसामुळे कापणी बरोबरच मळणीची कामे आटोपण्याकडे शेतकरयांचा कल दिसतो आहे, मात्र सध्या मजुरांची वानवा शेतकरयांना मोठ्या प्रमाणावर भेडसावते आहे.

यंदा पावसाने अगदी सुरूवातीपासून चांगली साथ दिल्याने शेतीची कामे वेळेवर आटोपली. त्यामुळे पीकही उत्तम आले आहे. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवडयात शेतकरयांनी कापणीला सुरूवातदेखील केली, मात्र परतीचा पाऊस आडवा आला. जवळपास १५ दिवस हा पाऊस ठाण मांडून होता. त्यामुळे कापणीची कामे पूर्णपणे ठप्प झाली. परतीच्या पावसाने उभ्या पीकाचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले. जवळपास चार हजार हेक्टर क्षेत्राला याचा फटका बसला. पाऊस थांबायचे नाव घेत नव्हता परीणामी शेतकरी धास्तावला होता. हळव्या बरोबरच आता गरवी म्हणजे उशिरा होणारे भातपिकदेखील कापणी योग्य झाले आहे.

आता पाऊस पूर्णपणे थांबला आहे. धुके पडायला सुरूवात झाल्याने पाऊस गेल्याची चाहूल शेतकरयांना लागली. त्यामुळे आता पुन्हा एकदा भातकापणीची कामे सुरू झाली आहेत. या कामांसाठी मजुरांची कमतरता भासते आहे. एकमेकांना मदत करून शेतकरी कापणीची कामे करीत आहेत. कापणी केलेली पिके शेतातच वाळत टाकली जातात. त्यात दोन दिवस जातात. दरम्यानच्या काळात आधी कापणी झालेल्या पिकांची मळणी करून निसर्गाने दिलेले जास्तीत जास्त पदरात पाडून घेण्याचा शेतकरयांचा प्रयत्न दिसतो आहे.



### बाजारातील प्लास्टिक, रबरच्या तयार बंधांचा वापर

भातपिकाची कापणी झाल्यानंतर त्याचे भारे बांधण्यासाठी पेंढयाचे बंध तयार केले जातात. हे बंध तयार करणे ही एक कला आहे. आता हे बंध तयार करणारे राहिले नाहीत. त्यामुळे बाजारात मिळणाऱ्या प्लास्टीक, रबर यांच्या तयार बंधांचा वापर भारे बांधण्यासाठी केला जातो. त्यामुळे बंध तयार करण्यासाठी लागणारे श्रमदेखील वाचत आहेत.

### आधुनिकतेची कास

शेतीतील आधुनिक प्रगत तंत्रज्ञानाची कास धरीत शेतकरी वर्गपारंपारीक शेतीला छेद देण्याचा प्रयत्न करीत आहे. भातकापणी बरोबरच मळणीसाठी आता यंत्रांचा वापर केला जावू लागला आहे. शेतातच ताडपत्री पसरून यंत्रांच्या सहाययाने भातमळणी करण्यात बरेच शेतकरी व्यस्त आहेत.

# माथेरान शहरातील मोकाट जनावरांकडे लक्ष देण्याची मागणी

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान शहराच्या मध्यवर्ती असलेल्या बाजार पेठेत मोकाट जनावरांचा उपद्रव सुरू असून येथील स्थानिक नागरिक चांगलेच हैराण झाले आहेत. अचानकपणे ही जनावरे अंगावर येत असल्याने भीतीचे वातावरण येथे पसरले आहे. यासंबंधी वेळीच माथेरान नगरपालिकेने योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी स्थानिकां मधून केली जात आहे.

पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान शहरातील मुख्य बाजार पेठे मध्ये मोकाट व भटकी जनावरे जागोजागी बसलेली असतात. कधी कधी तर ही जनावरे अचानकपणे पर्यटक आणि स्थानिकांच्या अंगावर सुद्धा येतात.

आता दिवाळी हंगाम सुरू झाला असून दिवसेंदिवस येथे गर्दीचे प्रमाण वाढणार आहे. त्यामुळे ऐन गर्दीच्या वेळी पर्यटकांना आणि नागरिकांना यांच्या मधून रस्ता काढत जावे लागते. माथेरान नगरपालिकेने या भटक्या जनावरांसाठी गोशाळा उभारली आहे. तरी देखील या भटक्या जनावरांचे मालक याचा योग्य उपयोग करीत नसल्याने आणि पालिकादेखील याकडे दुर्लक्ष करीत असल्याने या मोकाट गुरांचा उपद्रव वाढला आहे.



ऐन गर्दीच्या वेळी या मोकाट गुरांमुळे दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नगरपालिकेने या समस्येकडे दुर्लक्ष न करता त्वरित उपाययोजना करावी, अशी मागणी स्थानिकांमधून केली जात आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते आहे की, आमचे अशिल श्री. अमित सुधाकर पाटील आणि सौ. सोनाली अमित पाटील यांनी **श्री. दिगंबर रघुनाथ मुणगेकर** यांच्याकडून दि. ११/०७/२०२४ रोजीचे नोंदणीकृत कराराने सिडको लि. यांच्याकडून वितरीत करण्यात आलेला खालील वर्णनाचा भूखंड मोबदल्यापोटी हस्तांतरीत करुन घेतलेला आहे. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**- भूखंडाचे वर्णन -**

**नविन पनवेल नोड, ता. पनवेल, जि. रायगड**

**गव्हर्नमेंट सर्व्हेट को. ऑ. हौसिंग सोसायटी, भूखंड नं. ४५, सेक्टर नं. २, क्षेत्र ११९.०० चौ.मी., नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**

वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदीखताव्दारे विकत घेतले आहेत व सिडको महामंडळाकडे वरील मिळकत हस्तांतरण करणे कामी रितसर अर्ज दिलेला आहे. तरी सदर भूखंडांवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजण्यात येईल व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल.
दिनांक : २८/१०/२०२४.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मोबाईल क्र. : ९८१९९२२७२०

# तळोजामध्ये तीन बांगलादेशी जेरबंद

## दोन महिलांसह एका पुरुषाचा समावेश



**पनवेल : वार्ताहर**

दहशतवाद विरोधी पथक नवी मुंबई युनिटने तळोजा, सेक्टर-२३ मधील द्विशा हाईटस् या इमारतीवर छापा मारून मागील २० ते २५ वर्षापासून बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या दोन महिला आणि एक पुरुष अशा तीन बांगलादेशी नागरिकांना अटक केली आहे. या तीन्ही बांगलादेशी नागरिकांनी भारतील ओळखीचा पुरावा असलेले आधारकार्ड आणि पॅनकार्ड बनवून घेतल्याचे उघडकीस आहे.

तळोजा, सेक्टर-२३ मधील द्विशा हाईटस् या इमारतीमध्ये काही बांग्लादेशी नागरिक बेकायदेशीररित्या वास्तव्य करत असल्याची माहिती दहशतवाद विरोधी पथकाच्या नवी मुंबई युनिटला मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रतिभा शेंडगे, पोलीस निरीक्षक तुकाराम नलवडे आणि त्यांच्या पथकाने तळोजा, सेक्टर-२३ मधील द्विशा हाईटस् इमारतीतील दोन संशयित घरावर छापा मारला.

या वेळी एका घरामध्ये शोझीब बोलू शेख (वय ३७) आणि अमिना उर्फ राणी शोझीब (वय २८) असे पती-पत्नी तर दुसऱ्या घरामध्ये रोवून नेकबोरे झामन मुल्ला (वय ३५) आणि रेश्मा रोवुन झामन मुल्ला (वय ३५) असे पती-पत्नी राहत असल्याचे आढळून आले. त्यामुळे दहशतवाद विरोधी पथकाने या चौघांना ताब्यात घेतले. त्यानंतर दहशतवाद विरोधी पथकामधील अधिकार्यांनी त्यांच्याकडे कागदपत्रांची चौकशी केली असता, त्यांच्याकडे भारतातील ओळखपत्र आधारकार्ड आणि पॅनकार्ड आढळून आले. पोलिसांनी त्यांच्याजवळ असलेले आधारकार्ड आणि पॅनकार्ड जप्त केले.

यावेळी पोलिसांनी बांगलादेशी नागरिकांच्या मोबाईल फोनची तपासणी केली असता त्यांच्या मोबाईल फोनमध्ये बांग्लादेशी कॉलींग कन्ट्री कोडने सुरु होणारे अनेक संपर्क नंबर आढळून आले. तसेच त्यांच्या मोबाईलमध्ये इमो नावाचे आप्लकेशन्स सुध्दा आढळून आले असून त्याद्वारे त्यांनी बांगलादेशात व्हिडीओ कॉल झाल्याचे आढळून आले. त्यानंतर दहशतवाद विरोधी पथकाने केलेल्या चौकशीत चौघांनी २० ते २५ वर्षापूर्वी घुसखोरीच्या मार्गाने भारत-बांगलादेश सीमेवरील गस्ती पथकाची नजर चुकवून आणि स्थानिक मुलकी अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय तसेच कोणत्याही वैध प्रवासी कागपत्रांशिवाय भारतात प्रवेश केल्याचे कबूल केले. तेव्हापासून ते भारतात राहत असल्याचे आढळून आले. त्यामुळे दहशतवाद विरोधी पथकाने २ महिला आणि १ पुरुष या तिघांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात पारपत्र (भारतात प्रवेश) आणि विदेशी व्यक्ती अधिनियमानुसार गुन्हा दाखल करुन तिघांना अटक केली आहे.

दरम्यान, या कारवाईत ताब्यात घेण्यात आलेला चौथा बांग्लादेशी नागरिक रोवुन नेकबोरे झामन मुल्ला (वय ३५) याच्या विरोधात २०२० मध्ये मुंबईतील सहार विमानतळ पोलीस ठाण्यात पारपत्र कायदा, परदेशी नागरिक कायदा तसेच फसवणूक आणि बनावटगिरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल असल्याचे त्याच्या चौकशीत आढळून आले आहे. हा गुन्हा न्यायप्रविष्ठ असल्याने या गुह्यात आरोपी रोवुन मुल्ला याची जामिनावर सुटका करण्यात आली आहे. त्यामुळे त्याला सोडून देण्यात आले.

# आमदार मंदा म्हात्रेंच्या उपस्थितीत सीबीडीत महायुतीचा कार्यकर्ता मेळावा



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र निवडणुकीचा बिगुल वाजताच संपूर्ण राज्यात निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. त्याच अनुषंगाने आज १५१ बेलापूर विधानसभा क्षेत्रामधील सीबीडी येथील वारकरी भवनमध्ये आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यासमवेत कार्यकर्ता मेळावा झाला.

या मेळाव्याला उदंड प्रतिसाद विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच नागरिकांनी दिला तसेच एकमुखाने मंदा म्हात्रे यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आश्वासन दीले. या वेळी मंदा म्हात्रे यांनी केलेल्या कामाने आम्ही प्रभावित झाल्याचे उपस्थित नागरिकांनी सांगितले. जर दहा वर्षांत बेलापूर पत्त्याचा हा विकास होतोय तर, पुढील पाच वर्षांचे प्लॅनिंगदेखील आमदारांच्या मनात नक्कीच असणार आहे. त्यामुळे यंदादेखील मंदा म्हात्रेच आमदारपदी निवडून आल्या पाहिजेत असा, पण नागरिकांनी केला.

या वेळी आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या समवेत माजी जिल्हाध्यक्ष सी व्ही रेड्डी, उत्तरप्रदेश प्रकोष्ठ राजाराम सिंग, ज्येष्ठ कार्यकर्ता गोपाल गायकवाड, कमल शर्मा, प्रभाकर कांबळे, महाराष्ट्र प्रदेश सचिव राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बाळासाहेब बोरकर, दामोदर पिल्ले, हस्तीमल जैन, मनोहर बाविस्कर, विजय शेट्टी, मेनन, बलबीर चौधरी, आरती राउल असंख्य पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### आज भरणार अर्ज

आमदार मंदा म्हात्रे यांनी २९ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ९:३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, सेक्टर १८ नेरूळ (पश्चिम) नवी मुंबई येथे नामांकन अर्ज भरण्याकरिता उपस्थित राहावे, अशी विनंती केली आहे.

# टेंडरच्या बहाण्याने लाखोंची फसवणूक

**नवी मुंबई :** सुशोभिकरणाच्या कामाचे टेंडर मिळवून देण्याचे आमिष दाखवून व्यावसायिकाच्या नावे कर्ज काढल्याचे उघडकीस आले आहे. यामध्ये व्यावसायिकाची ९४ लाख ८६ हजारांची फसवणूक झाली आहे. या प्रकरणी वाशी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाशी परिसरात राहणाऱ्या व्यावसायिकासोबत हा प्रकार घडला आहे. परिचयाच्या व्यक्तींनी त्यांना अमरावती येथे सुशोभिकरणाच्या कामाचे कंत्राट मिळवून देतो असे सांगितले होते. टेंडरच्या बहाण्याने त्यांनी व्यावसायिकाच्या वाहनांवर ९४ लाख ८६ हजार रुपयांचे कर्ज काढून परस्पर ते हडप केले. हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांनी संबंधितांना संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. यामुळे त्यांनी संबंधितांविरोधात वाशी पोलिसांकडे तक्रार केली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दीपोत्सवानिमित्त आपण सर्वजण एकत्र येऊ -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माणुस हा माणुसकीने श्रीमंत होत असतो, त्यामुळे या दीपोत्सवाच्या निमित्ताने आपण सर्वजण एकत्र येऊन हा सण साजरा करूया, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित केलेया दीपोत्सवावेळी केले.

दिवाळीच्या पावन सणानिमित्त पनवेल शहरात उत्सवाचे वातावरण पसरले आहे. शहरातील विविध भागात रोषणाई केल्याने संपुर्ण पनवेल उजाळून निघाले आहे. यानिमित्त शहरातील मिडल क्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानात सोसायटी मित्रमंडळाच्या वतीने दीपोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या ठिकाणी दरवर्षी आकर्षक अशी रोषणाई करून पनवेलकरांना आकर्षित करण्यात येते. त्यानुसार यंदाही आयोजित केलेल्या दीपोत्सवामुळे परिसर उजळून गेला आहे. याचा शुभारंभ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाला.



या वेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, अमरीश मोकल, शहर उपाध्यक्ष अमित ओझे, महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्षा राजश्री वावेकर, उद्योजक राजू गुप्ते, मंगेश परुळेकर, माजी नगरसेवक अजय बहिरा, प्रभाकर बहिरा, भाजप नेते जगदीश घरत, सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष सुमित झुंझारराव, केदार भगत, सुहासिनी केकाणे, आदेश ठाकूर, अपूर्व ठाकूर यांच्यासह रहिवासी उपस्थित होते.

# कोकण भवनमध्ये दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त शपथ

**नवी मुंबई : बातमीदार**

जीवनाच्या सर्व क्षेत्रात सच्चेपणा आणि कायद्याचे पालन करेन, लाच घेणार नाही आणि लाच देणार नाही, सर्व कामे प्रामाणिकपणे आणि पारदर्शक पध्दतीने करेन, जनहितासाठी कार्य करेन अशी प्रतिज्ञा घेऊन भ्रष्टाचाराविरुध्द जनजागृती होण्याच्या उद्देशाने आज कोकण भवनमध्ये दक्षता जनजागृती सप्ताहाचा प्रारंभ करण्यात आला.

विभागीय महसूल कार्यालयाच्या बैठक सभागृहात सोमवारी (दि.२८) सकाळी ११ वाजता अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) संजीव पलांडे यांनी उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबत भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ दिली.



दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात येते, त्या सप्ताहात दक्षता जनजागृती सप्ताह साजरा केला जातो. सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा आणि सत्यनिष्ठा याबद्दलच्या दृढनिश्चयाचे बळकटीकरण करण्यासाठी नागरिकांच्या सहभागाने हा सप्ताह साजरा करण्यात येतो. यंदाच्या २०२४ या वर्षी केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार २८ ऑक्टोबर ते ०३ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत या 'दक्षता जनजागृती सप्ताहाचे' आयोजन करण्यात आले आहे.

उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेतली. या वेळी महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त जनतेला दिलेल्या संदेशाचे वाचन केले. या वेळी कोकण भवनमधील विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अजिवली केंद्राला कायाकल्प पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र व राज्य शासनाच्या वतीने शासकीय रुग्णांचा आरोग्य सुविधांचा दर्जा व नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात या हेतून आरोग्य संस्थांना कायाकल्प पुरस्काराने गौरविण्यात येते. सन २०२३-२४ या वर्षातील कायाकल्प पुरस्कारांची घोषणा आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आली.

रायगड जिल्ह्यामध्ये सन २०२३ - २४ या वर्षांमध्ये राबविण्यात आलेल्या कायाकल्प उपक्रमामध्ये ५४ आरोग्य केंद्रांनी तसेच २८८ आरोग्य उपकेंद्रानी सहभाग घेतला होता, त्यामध्ये १० प्राथमिक आरोग्य केंद्रांसह ४३ आरोग्य उपकेद्रांना हा पुरस्कार जाहीर झाला असून या उपक्रमामध्ये पनवेल तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली यांना प्रथम क्रमांकाचे पुरस्कार मिळाले आहे.

डॉ.भरत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद अलिबाग- रायगड तसेच डॉ. मनिषा विखे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाने उत्कृष्ट काम केले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली, पनवेल यांनी रायगड जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांकाचे पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी डॉ. सुनील नखाते, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय-पनवेल, डॉ.सायली मानकर व डॉ. राज चव्हाण, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली येथील सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# अजगराला जीवदान

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर (मूळपाडा) येथे एका १० फूट लांब अजगराला जीवदान देण्यात आले आहे.



चिरनेर (मूळपाडा) येथे राहणारे रमाकांत ठाकूर यांच्या घराशेजारील शेती कापण्याचे काम सुरू होते. १० फुट लांब असा अजगर त्यांना शेतात दिसला. त्यांनी फ्रेंड्स ऑफ नेचर चे सदस्य व सर्प मित्र तथा रायगड भूषण राजेश नामदेव पाटील यांना कळविले.

राजेश पाटील व सर्प मित्र जयवंत ठाकूर यांनी अजगराला पकडून चिरनेर जवळील इंद्रायणी डोंगरात-जंगलात सुखरूप सोडून दिले. आजपर्यंत हजारो साप विषारी व बिनविषारी साप पकडून जंगलात सोडून देवून त्यांचे जीव वाचविले आहे.

# लॉकरमधील दागिने पत्नीने चोरले, गुन्हा दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पती-पत्नीने संयुक्तपणे लॉकरमध्ये ठेवलेले सात लाख रुपयांचे सोन्याचे दागिने लॉकरमधून काढून नेल्याप्रकरणी पत्नी विरोधात खारघर पोलीस ठाण्यात कलम ३८० नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

सेक्टर १०, खारघर, कोपरा येथे राहणारे पती-पत्नी यांचे कौटुंबिक वाद सुरू आहेत. सध्या ते वेगवेगळे राहतात. दोघांनी मिळून फेब्रुवारी २०२१ मध्ये बँक ऑफ इंडिया, सेक्टर १०, खारघर येथे लॉकर संयुक्तपणे अर्ज करून उघडला. त्या दिवशी त्यांनी सोन्याचे दागिने व काही कागदपत्र त्यात ठेवली. एप्रिल २०२४ मध्ये ते कागदपत्रे नूतनीकरणासाठी बँकेत गेले.

या वेळी लॉकरची तपासणी केली असता त्यात सोन्याचे दागिने मिळून आले नाहीत. हे लॉकर चार वेळा वापरले गेल्याचे रजिस्टरवरून दिसून आले. याबाबत त्यांनी बँकेकडे तक्रार केली. त्यांच्या पत्नीने त्यांची खोटी नोंद आणि सही करून लबाडीच्या हेतूने सोन्याचे दागिने चोरून नेले.

# जास्त आवाजाचे फटाके फोडण्यास मनाई

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलिसांनी आपल्या कार्यक्षेत्रात शांतता-सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने दीपावली सणाच्या कालावधीत नागरिकांना रस्त्यावर फटाके फोडण्यास तसेच १२५ डेसीबल पेक्षा जास्त आवाज करुन ध्वनी प्रदुषण करणारे, मोठ्या आवाजाचे फटाके फोडण्यास मनाई केली आहे.



रात्री १० ते सकाळी ६ या कालावधीत कोणत्याही प्रकारचे फटाके फोडण्यासदेखील मनाई करण्यात आली आहे. नवी मुंबई पोलिसांच्या विशेष शाखेच्या पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर यांनी २३ ऑक्टोबरपासून याबाबतचे आदेश नवी मुंबईत लागू केले आहेत.

येत्या २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर या कालावधीत दीपावली उत्सव सर्वत्र साजरा होत आहे. दीपावली उत्सवाच्या कालावधीत देशविघातक आणि देशद्रोही व्यक्ती मोठ्या आवाजाचे फटाके किंवा शोभेच्या फटाक्यांच्या आड, तसेच त्याच्या आवाजाचा फायदा घेवून स्फोटकांचा स्फोट घडवून नागरिकांच्या जीवितास तसेच सार्वजनिक मालमत्तेस धोका निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नवी मुंबई पोलिसांनी आपल्या कार्यक्षेत्रात शांतता-सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने दीपावली उत्सवामध्ये नागरिकांनी रस्त्यावर किंवा रस्त्यापासून ५० फुटांच्या आत कोणतेही फटाके उडविण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच १२५ डेसीबल पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांचे उत्पादन आणि विक्री करण्यास तसेच फटाके फोडण्यास मनाई करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ध्वनी निर्माण करुन आवाजाचे प्रदुषण करणार्या फटाक्यांवर रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत संपूर्णत: मनाई करण्यात आली आहे.

नवी मुंबई पोलिसांच्या विशेष शाखेने २३ ऑक्टोबर रोजी याबाबतचे आदेश लागू केले आहेत. दिवाळी सणांमध्ये एखादी अनुचित गंभीर स्वरुपाची घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दित प्रज्वलित केलेले आकाश कंदिल हवेत उडविण्यावर, विक्री करण्यावर तसेच साठा करण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्यासाठी नवी मुंबई पोलिसांनी मनाई आदेश लागू केले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणार्यांवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ अन्वये कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे.

# पनवेल परिसरातील अपघातांमध्ये तिघे ठार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात तीन ठार झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

त्यामध्ये पनवेलजवळील अजिवली स्टॉप येथील नवकार लॉजिस्टीक कंपनी गेटसमोर मयत अनिलकुमार ठाकूर (वय ३९) हा त्यांचे भिंगारवाडी पनवेल येथील गॅरेजमधील काम संपवून पिवळ्या रंगाच्या होंडा डिओ स्कुटी चालवत घेवून अजिवली येथील राहत्या घरी येत असताना लॉजिस्टीक कंपनीसमोर पाठीमागून येणार्या टँकरने त्याच्या स्कूटीस धडक मारून झालेल्या अपघातात तो गंभीररित्या जखमी होवून तो मयत झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

दुसऱ्या घटनेत पळस्पे ते जेएनपीटीकडे जाणाऱ्या हायवेवरती टी पॉईंट जंक्शनच्या सर्व्हीस रोडवर ब्रीजच्या जवळ एका डंपरची हिरो एक्स्ट्रीम दुचाकीला धडक बसल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वार प्रथम म्हात्रे (वय २३) व साक्षी जाधव (वय २४) हे गंभीररित्या जखमी होवून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# शिवसेना उबाठाची अस्तित्वासाठी धडपड

## माथेरानमधील मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**माथेरान : प्रतिनिधी**

कर्जत-खालापूर मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून नितीन सावंत यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे नाराज पदाधिकाऱ्यांनी अपक्ष उमेदवार सुधाकर घारे यांना पाठिंबा दर्शविला आहे. त्यात माथेरानमधील उबाठा गटाचे विविध विभागातील कार्यकर्ते पक्षाला रामराम करीत स्वखुशीने शिवसेना शिंदेगटात प्रवेश करीत आहेत. त्यामुळे सध्या माथेरानमध्ये शिवसेना उबाठा गटाची अस्तित्वासाठी धडपड सुरू आहे.



माथेरान इंदिरा गांधी नगरमधून तुकाराम आखाडे, लक्ष्मण कदम, दिलीप सकपाळ, बाबू ढेबे, अनिकेत आखाडे, लक्ष्मण शिंगाडे, अजय बिरामणे, ललित पांगसे, सिद्धेश घाग, ऋषिकेश बिरामणे, भारत बिरामणे, लहू आखाडे, जनार्दन गोरे, रामचंद्र ढेबे, अमर शिंदे, संतोष आखाडे, वसंत ढेबे, अमोल आखाडे, सलीम मुजावर, झिमा आखाडे तसेच पंचवटी नगरमधील प्रविण चौगुले, तुषार बिरामणे आणि बाजारपेठ येथील संदीप कदम, भूषण शिंदे, प्रतिक ठक्कर यांनी शिवसेनेत प्रवेश केला. शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांची खरी शिवसेना असून आम्ही कोणतीही अभिलाषा न बाळगता शिवसेना शिंदेगटात जाहीर प्रवेश करीत आहोत, असे या वेळी शिवसैनिकांनी सांगितले.

माथेरानमधील उद्धव ठाकरे गटाच्या काही निवडक नेत्यांनी मागील आठवड्यात पक्षाचे राजीनामे देऊन अपक्ष उमेदवाराला पाठींबा जाहीर केला होता, मात्र मातोश्रीवरून ओदश आल्यानंतर ही मंडळी पुन्हा पक्षाचे काम करणार असे सांगू लागले. या सर्व घडामोडीत उबाठा नेत्यांनी गावातील शिवसेना कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले नाही. नेत्यांनी परस्पर निर्णय घेतल्यामुळे अनेक विभागातील जुने कार्यकर्ते नाराज झाले होते. उबाठा नेते आपल्या सोयीनुसार आणि वैयक्तिक लाभासाठी चुकीचे निर्णय घेत सोयीचे राजकारण करीत असल्याने कार्यकर्त्यांमध्ये अस्थिरता निर्माण होऊन तीव्र नाराजी पसरली आहे. पक्षाचे नेते जर स्वतःच्या सोयीनुसार पक्ष चालवीत असतील तरआम्ही कार्यकर्ते पण आमचा वेगळा मार्ग निवडत असून आम्ही शिवसेना शिंदे गटात प्रवेश करीत असल्याचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सांगितले.

शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी, शहरसंघटक मनोज खेडकर, संपर्क प्रमुख निखिल शिंदे, उपशहर प्रमुख प्रमोद नायक या सर्व पदाधिकाऱ्यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून जाहीर प्रवेश करीत आहोत. कर्जत मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार महेंद्र थोरवे यांना माथेरानमधून मोठे मताधिक्य मिळवून देणार माथेरानमधून महेंद्र थोरवे यांना सर्वात जास्त मते मिळवून देऊ, असे पण यावेळी पक्ष प्रवेश करणाऱ्या शिवसैनिकांनी सांगितले.

इतक्या मोठ्या पक्षप्रवेशामुळे उबाठा गटात आता फक्त काही नेतेमंडळीच शिल्लक राहिली असून उबाठा गटाची अस्तित्वासाठी धडपड सुरू आहे.

# पोलादपुरात महिला मतदारांची संख्या अधिक

**पोलादपूर : रामप्रहर वृत्त**

तालुक्यात ४२ हजार ५४ मतदार आहेत. यामध्ये महिलाही संख्या ५०४ने जास्त असल्याने त्याची मते निर्णायक ठरणार आहे. बहुतांश मतदार बाहेरगावी असल्याने त्याची मते ज्या उमेदवाराच्या पारड्यात पडणार त्याचे मताधिक्क्य विजयाच्या दृष्टीने निर्णायक ठरणार आहे.

महाड मतदारसंघातील पोलादपूर तालुका हा महत्त्वाचा व निर्णायक समजला जातो. दोन जिल्हा परिषद, चार पंचायत समिती व एक नगरपंचायत असलेल्या पोलादपूरातील मतदार निवडणुकीमध्ये निर्णायक भूमिका बजावत आहेत. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे अनंत गीते व राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील तटकरे यांच्यात प्रमुख सामना झाला होता. १९४ महाड विधानसभा मतदारसंघात एक लाख ६३ हजार ७९३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावत



खासदार सुनील तटकरे यांच्या बाजूने कौल दिला.

२०१९च्या विधानसभा निवडणुकीत तालुक्यातील ६५ मतदान केंद्रनिहाय मतदानाच्या आकडेवारीनुसार आमदार भरत गोगावले यांना तालुक्यातील आंब्रेकोंड, वडघर बुद्रुक, कामथे, सडे, मोरसडे, कालवली, दिवील, पारले लोहारे, लोहारे २, तुर्भे बुद्रुक, तुर्भे खोंडा, आडावळे बुद्रुक, बोरघर, गोवेले, वझरवाडी, चरई, पोलादपूर एक वगळता उर्वरित पाच मतदान केंद्र, काटेतळी, मोरगिरी, बोरावळे, उमरठ, करंजे, देवळे, वाकण १ व २, कापडे बुद्रुक १, महालुंगे, केवनाळे, रानकडसरी दाभिळ, कापडे खुर्द, भोगाव खुर्द, गोळेगणी, निवे, किनेश्वर, पैठण, परसुले, कोतवाल खुर्द, कुडपण बुद्रुक, पळचिल या मतदान केंद्रावर मिळालेले मताधिक्क्य मिळाले होते.

काँग्रेसचे उमेदवार स्व. माणिक जगताप यांना पोलादपूर तालुक्यातील माटवण, सवाद १ व सवाद २, धारवली, तुर्भे खुर्द, पोलादपूर १, रानवडी बुद्रुक, घागरकोंड, साखर, नाणेघोळ, कापडे बुद्रुक २, फौजदारवाडी, धामणदेवी, देवपूर, कोंढवी, चांभारगणी बुद्रुक, महालगुर, कोतवाल बुद्रुक, ओंबळी या मतदान केंद्रांमध्ये मताधिक्य मिळालेले दिसून येताना शिवसेनेच्या ताब्यातील सवाद आणि चांभारगणी बुद्रुक अनुकूल झालेले दिसते तर शेकापक्षाचे रानवडी बुद्रुक, घागरकोंड, माटवण, पोलादपूर १ अंतर्गत चोळई व सडवली या मतदानकेंद्रांनी आघाडीचा धर्म पाळलेला दिसून आला होता.

तालुक्यातील ४२ हजार ५४ मतदारांमध्ये २० हजार ७७५ तर महिला मतदार २१हजार २७९ जवळपास ५०४ महिला मतदार जास्त आहेत. त्यामुळे त्यांची मते महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत.

# आमदार महेंद्र थोरवेंच्या विजयासाठी खोपोलीतील मुस्लिम बांधवांचे साकडे

**खोपोली : प्रतिनिधी**

कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघाचा विकासाच्या माध्यमातून चेहरा मोहरा बदलणारे महायुतीचे आमदार महेंद्र थोरवे यांना पुन्हा एकदा विधानसभेत पाठवण्यासाठी कार्यकर्ते कामाला लागले आहेत. आमदार महेंद्र थोरवे यांच्या विजयासाठी खोपोली परिसरातील अजमेर दर्ग्यावर मुस्लिम बांधवांनी साकडे घातले आहे.



कर्जत खालापूर विधानसभा मतदारसंघात २०१९च्या निवडणुकीत आमदार म्हणून महेंद्र थोरवे मोठ्या मताधिक्क्याने निवडून गेले. या काळात राजकीय परिस्थितीची झगडत महेंद्र थोरवे यांनी मतदारसंघात न भूतो न भविष्यती असा विकासनिधी आणून विकास साधला. मतदारसंघाचा चेहरा मोहरा बदलला. अनेक प्रशासनाच्या योजना राबवून महिला वर्गाला हाताला काम तर बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून दिला गाव पाड्यावर रस्ते, पाणी विजेने गाव उजळविले. आता २०२४ची विधानसभा निवडणूक उभी ठाकली आहे. पुन्हा एकदा मतदारसंघात शिवसेनेचा भगवा म्हणून आमदार महेंद्र थोरवे निवडून यावे म्हणून मुस्लिम समाजाने साकडे घातल्याचे सांगितले आहे.

# मध्य रेल्वेच्या प्रमुख स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकीटावर तात्पुरते निर्बंध

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने आगामी सणासुदीच्या काळात प्रचंड गर्दी लक्षात घेऊन निवडक प्रमुख स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरते निर्बंध लागू केले आहेत. प्लॅटफॉर्मवरील गर्दीचे व्यवस्थापन करणे आणि स्टेशन परिसरात प्रवाशांची हालचाल सुरळीतपणे सुनिश्चित करणे हे याचे उद्दिष्ट आहे.

दिवाळी सण आणि छठ पूजेदरम्यान प्लॅटफॉर्म तिकिट विक्रीचे निर्बंध ८ नोव्हेंबरपर्यंत लागू आहेत. स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिट विक्री प्रतिबंधित मध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, लोकमान्य टिळक टर्मिनस, ठाणे, कल्याण, पुणे, नागपूर या स्थानकांचा समावेश आहे.

यांमध्ये ज्येष्ठ नागरिक आणि वैद्यकीय गरजा असलेल्यांना प्रवास सुलभ व्हावा यासाठी या निर्बंधांमधून सूट देण्यात आली आहे. सणासुदीच्या काळात सुरळीत आणि सुरक्षित प्रवासाचा अनुभव घेण्यासाठी प्रवाशांनी त्यानुसार नियोजन करावे आणि नवीन नियमांचे पालन करावे, अशी विनंती मध्य रेल्वेकडून करण्यात आले आहे.

# लायन्स क्लब अलिबागतर्फे रक्तदान शिबिर उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

जिल्हा शासकीय रुग्णालयात रुग्णांना विविध प्रकारच्या रक्तगटाच्या रक्ताची आवश्यकता नेहमीच भासते. लायन्स क्लब अलिबाग आणि कच्छ युवक संघ शाखा अलिबागने कच्छी जैनभवन, श्रीबाग येथे यासाठी रक्तदान शिबिर आयोजित केले होते.



सेकंड डिस्ट्रिक्ट गव्हर्नर प्रवीण सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या शिबिरात लायन्स क्लब ऑफ अलिबाग अध्यक्ष अ‍ॅड. गौरी म्हात्रे, सचिव महेश कवळे, खजिनदार अंकिता म्हात्रे, फर्स्ट व्हीपी प्रदीप नाईक, गॅट को-ऑर्डिनेटर अनिल म्हात्रे, डिस्ट्रिक्ट को-ऑर्डिनेटर नयन कवळे, डिस्ट्रिक्ट चेअरमन कम्युनिटी सर्व्हिस गिरीश म्हात्रे, महेंद्र पाटील, संतोष पाटील, अभिजित आमले, प्रकाश देशमुख, अभिजित पाटील, कच्छी युवक संघाचे पदाधिकारी केतन शाह, धीरेंद्र काराणी, रणजित जैन, शासकीय रुग्णालयातील रक्तपेढी विभागाचे डॉ. दीपक गोसावी, सुनील बंदीछोडे, वैभव कांबळे, गणेश भोये आदींसह कर्मचारी आणि रक्तदाते उपस्थित होते.

ऑनलाईन रजिस्ट्रेशनसाठी अभिजित पाटील तर जाहिरात प्रदर्शनासाठी महेंद्र पाटील यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.

# मुरूड आणि रोह्यातील भजनी मंडळांचा सन्मान



**मुरुड : प्रतिनिधी**

तालुक्यातील नांदगाव माळी समाज हॉल येथे जय भवानी प्रासादिक भजन मंडळ नांदगावतर्फे मुरूड व रोहा तालुक्यातील ४० भजनी मंडळांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वेळी प्रत्येक मंडळास आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमास बुवा विद्याधर चोरघे, विनोद दळवी, नरेंद्र चोरघे, सुगंधा दळवी, अमित चोरघे, अक्षय भाटकर, उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, अशोक धुमाळ, जिल्हा संघटक दिनेश मिणमिने, मुरुड तालुका संघटक यशवंत पाटील, नांदगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच भाई सुर्वे, माजी चेअरमन महेश भगत, संपर्कप्रमुख चंद्रकांत मोहिते, माजी नगरसेवक आशिष चंद्रकांत आदींसह कार्यकर्ते, इतर भजनीबुवा उपस्थित होते.

या वेळी आमदार महेंद्र दळवी म्हणाले की, मी लोकांत मिसळणार व लोकांमध्ये राहणारा आमदार आहे. लोकांची कामे प्राधान्याने सोडवल्यामुळे अलिबाग तालुक्यामधून जास्तीत जास्त मते मला मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# रातवड विद्यालयात दिवाळीनिमित्त उपक्रम

## किल्ला, आकाशकंदील, भेटकार्ड उपक्रमात विद्यार्थी सहभागी

**माणगाव : प्रतिनिधी**

शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात दीपावलीनिमित्ताने विविध उपक्रम व दीपोत्सवाचे आयोजन सोमवारी (दि.२८) करण्यात आले होते.



प्रथम सत्र परीक्षेनंतर साजऱ्या होणाऱ्या दीपावली उत्सवाचे औचित्य साधून विद्यालयात आकाशकंदील, भेटकार्ड व किल्ले बनविण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थी सुट्टीला जाण्यापूर्वी शाळेने प्रतिवर्षीप्रमाणे दीपोत्सवाचे आयोजन केले होते. परीक्षेनंतर दोन दिवस विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. आकाशकंदील, भेटकार्ड व किल्ले विद्यार्थ्यांनी तयार केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले. यानिमित्ताने अनेक विद्यार्थ्यांनी फटाके वाजवून व खाऊवाटप करून आनंद व्यक्त केला.

छत्रपती श्री शिवाजी महाराज व मासाहेब जिजाऊ यांची वेशभूषा विद्यार्थ्यांनी साकारली होती. प्रतापगड किल्ल्यावर औक्षण करून छत्रपती शिवाजी महाराजांची ओवाळणी करण्यात आली. विद्यालयात प्रतिवर्षी दीपोत्सवाचे आयोजन केले जाते. विद्यार्थी स्वतः हून विविध उपक्रमात सहभागी होतात. विविध किल्ल्यांची पुस्तके पाहतात व आवडलेला किल्ला बांधतात. किल्ल्यासाठी लागणारे साहित्य परिसरातून जमा करतात व आकर्षक अशी सजावट रोषणाई करतात. विद्यालयाच्या या उपक्रमात मुख्याध्यापक संतोष कदम यांचे मार्गदर्शन लाभले. श्रीकृष्ण गर्दे यांनी किल्ला बनविण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी सुंदर अशी किल्ल्याची प्रतिकृती बनवली होती, तसेच विद्यालयातील शिक्षक व शिक्षिकांनी आकाशकंदील व भेटकार्ड बनविण्यासाठी मार्गदर्शन केले. शाळेत राबविलेल्या या उपक्रमातून प्रेरणा घेऊन अनेक विद्यार्थ्यांनी आपापल्या घरीसुद्धा किल्ले व आकाशकंदील बनविले. घरी बनविलेल्या आकाशकंदील व किल्ल्यांमुळे पालकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघामध्ये अपक्षासह काँग्रेसकडून अर्ज दाखल

**श्रीवर्धन : बातमीदार**

१९३ श्रीवर्धन विधानसभा क्षेत्रामध्ये विधानसभेच्या निवडणुकीसाठी महायुतीच्या अधिकृत उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या आदिती तटकरे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर सोमवारी (दि.२८) एका अपक्ष उमेदवारासह बळीराम सेनेचे कृष्णा कोबनाक यांनीदेखील आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

महाविकास आघाडीकडून सोमवारी काँग्रेसकडून राजेंद्र ठाकूर यांनीदेखील आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे, तर मंगळवारी आघाडीचे दुसरे उमेदवार अनिल नवगणे हे आपला उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत बिघडी झाल्याची चर्चा आहे, तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने फैसल पोपेरे यांना तिकीट दिले असून तेदेखील श्रीवर्धन विधानसभेच्या निवडणूक रिंगणात असणार आहेत.



# खोपोलीत दिवाळीनिमित्त खरेदी जोरात

**खोपोली : प्रतिनिधी**

सर्वांचा लाडका सण असलेल्या दिवाळीची तयारी व त्यानिमित्ताने खरेदीचा उत्साह चरण सीमेवर आहे. खोपोली बाजारपेठेतही खरेदीसाठी मोठी गर्दी उसळली असून बाजार व दुकाने फुल आहेत.



खरेदीत पारंपरिक दिवाळी सजावटीसाठी लागणारे साहित्याबरोबर सर्वाधिक नवीन कपडे, मिठाई, इलेक्ट्रॉनिक साहित्य व त्यानंतर सोने खरेदीकडे ग्राहकांचा कल आहे. रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने खोपोली बाजारपेठ ग्राहकांनी फुलली होती.

दिवाळीनिमित्त येथील कंपन्यांचा बोनस २५ तारखेपासून वितरित होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे, तसेच दिवाळी सणानिमित्त विशेष अनुदानही येथील कामगार व कर्मचाऱ्यांना देण्याची परंपरा आहे. बाजारपेठ ग्राहकांनी फुलली. किराणा दुकान, कपडे, मिठाई, इलेक्ट्रॉनिक्स, सोने, चांदीच्या दुकानात ग्राहकांनी प्रचंड गर्दी केली. सर्वाधिक व्यवसाय कपडे व मिठाई विक्रीत होत असल्याचे दुकान मालकांनी सांगितले.

# माथेरानमध्ये थंडीची चाहूल; पर्यटक सुखावले



**माथेरान : प्रतिनिधी**

राज्यात अजूनही ऑक्टोबरची हिट सर्वत्र जाणवत असताना माथेरान पर्यटनस्थळी थंडीची चाहूल लागली आहे. त्यामुळे येणाऱ्या पर्यटकांना या गुलाबी थंडीचे आनंद घेता येणार आहे.

यंदा परतीच्या पावसाने निम्मा ऑक्टोबर महिना गाजवला त्यामुळे ऑक्टोबर महिन्याची गरमी थोड्या उशिराने जाणवू लागली. सध्या संपूर्ण राज्यात ऑक्टोबर हिट सुरू आहे, मात्र प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या या माथेरान शहरात गुलाबी थंडीची चाहूल जाणवू लागली आहे. पहाटेच्या वेळी सर्वत्र धुक्याची दुलई नजरेस पडत आहे.

दिवाळी हंगामाच्या सुरुवातीलाच माथेरानमध्ये थंडी अवतरली असल्याने दिवाळी हंगामात येणाऱ्या पर्यटकांना आता माथेरानच्या गुलाबी थंडीचा आनंद लुटला येणार आहे. माथेरान शहरात थंडी अवतरली असल्याने येथील व्यावसायिकदेखील खुश झाले आहेत.

# महायुतीचे शक्तीप्रदर्शन





















## कामासाठी मुलगा पाहिजे

**अनुभव** :- MS-CIT, Tally कमीत कमी १ वर्षे अनुभव

**पत्ता** :- श्री.गणेश टेड्रर्स गाळा नं ४७-५० मार्केट यार्ड पनवेल

**मो.नं** :- ८६८९८९३७१५ ९०२९३३९९९९

**Salary: 15000 ते 18000**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com